





अॅग्रोवन स्मार्ट अॅवॉर्डस् २०१७

SAKAL-AGROWON PRESENTS

2ND EDITION OF

# SMART AWARDS 2017

DECEMBER 29, 2017 | 4 PM TO 8 PM
TILAK SMARAK, PUNE






ॲग्रोवन
स्मार्ट ॲवॉर्डस्
२०१७

# In Association
# With
# UPL Ltd.
# as valuable co-sponsor

# Logo appearance
# in Event Promotion Advt in Agrowon 5 Served

only Mumbai



● Date of Publication : शनिवार, २३ डिसेंबर २०१७, ● Posted at Market yard PSO Pune Daily.
आर.एन.आय. MAHMAR/2005 रजि. नं. PCW/081/2015-17/RNI No.14922

## शरद पवार, डॉ. मनमोहनसिंग आज एका व्यासपीठावर

### पवार यांच्या चरित्राचे प्रकाशन

**औरंगाबाद (प्रतिनिधी) :** शेषराव चव्हाण लिखित "पद्मविभूषण शरद पवार - द ग्रेट एनिग्मा'' या शरद पवार यांच्या चरित्राचे शनिवारी (ता. २३) माजी पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांच्या हस्ते येथे प्रकाशन करण्यात येणार आहे.

एमजीएम परिसरातील रुक्मिणी सभागृहात दुपारी तीन वाजता हा सोहळा होईल. या कार्यक्रमास शरद पवार यांची विशेष उपस्थिती राहणार आहे.

या वेळी महात्मा गांधी मिशनचे अध्यक्ष कमलकिशोर कदम, सेवाग्राम येथील कस्तुरबा गांधी वैद्यकीय महाविद्यालयाचे अध्यक्ष धीरूभाई मेहता, एमजीएमचे विश्वस्त अंकुशराव कदम यांचीही उपस्थिती राहणार आहे. एमजीएमतर्फे आयोजित हा कार्यक्रम केवळ निमंत्रितांसाठी असेल, असे आयोजकांनी कळविले आहे. सकाळी अकराला डॉ. सिंग हे दिल्ली येथून विमानाने औरंगाबादकडे प्रयाण करतील.

## 'आदर्श'प्रकरणी अशोक चव्हाण यांच्या चौकशीचा आदेश रद्द

**मुंबई :** आदर्श सोसायटी गैरव्यवहारप्रकरणी माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांची चौकशी करण्याचा राज्यपाल सी. विद्यासागर राव यांनी दिलेल्या परवानगीचा आदेश मुंबई उच्च न्यायालयाने शुक्रवारी (ता. २२) रद्द केला. यामुळे अशोक चव्हाण आणि काँग्रेसला मोठा दिलासा मिळाला आहे.

देशातील २-जी स्पेक्ट्रम गैरव्यवहार प्रकरणात सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता करण्याच्या गुरुवारच्या (ता. २१) निर्णयानंतर सलग दुसऱ्या दिवशी काँग्रेससाठी आनंदाची बातमी आली आहे. आदर्श गैरव्यवहार प्रकरणामुळे अशोक चव्हाण यांना मुख्यमंत्रिपद गमवावे लागले होते. या प्रकरणात त्यांची चौकशी करण्यासाठी आधी २०१३ मध्ये तत्कालीन राज्यपाल के. शंकर नारायणन यांनी परवानगी नाकारली होती. त्यानंतर काही दिवसांनी अचानक राज्यपाल राव यांनी परवानगी दिली होती. या निर्णयाला अशोक चव्हाण यांनी न्यायालयात आव्हान दिले होते.

TITAN eyeplus

तुमचा
सर्वोत्तम आंतरराष्ट्रीय ब्रँडसचा शोध
संपतो आमच्या येथे




13 पेक्षा अधिक जागतिक ब्रँड्सवरील लेटेस्ट फॅशन
सर्वांत आधी येत आहेत टायटन आयप्लस येथे!

TITAN eyeplus

भेट द्या: titaneyeplus.comला | संपर्क क्र.:18004198000 | 205 शहरांमध्ये 483 स्टोअर्स.




मातीशी नातं राखून आभाळाची उंची गाठणाऱ्या
कर्तृत्ववान व स्मार्ट शेतकऱ्यांना सन्मानित करणारा

ॲग्रोवनचा
दिमाखदार भव्य गौरव सोहळा!

~ पुरस्कार वितरण ~

दिनांक : २९ डिसेंबर २०१७
स्थळ : टिळक स्मारक मंदिर, टिळक रोड, पुणे
वेळ : सायंकाळी ४ ते ७

आवर्जून या!

प्रायोजक

सोनाई पशु आहार | UPL | जैन इरिगेशन सिस्टीम्स लि. | महाधन एक अतूट नातं!

बँक ऑफ महाराष्ट्र Bank of Maharashtra | ओरिएण्टल इन्श्योरन्स Oriental Insurance | चौधरी यात्रा कंपनी प्रा.लि.

# Logo appearance
# in Event Promotion Advt in Agrowon

All Edition Common





**व्हॅटिकन सिटी : येशू ख्रिश्त जन्मसोहळा सोमवारी (ता. २५) मध्यरात्री जगभरात पारंपरिक उत्साहात साजरा करण्यात आला. ख्रिश्चन धर्माचे धर्मगुरू पोप फ्रान्सीस यांनी व्हॅटिकन सिटी येथे बाल येशू जन्मसोहळ्याप्रसंगी प्रार्थना केली.**

## व्हिएतनाममध्ये चक्रीवादळात २३० लोक ठार; अनेक जखमी

**व्हिएतनाम (कोजेन्सेस वृत्तसंस्था):** फिलिपिन्समध्ये आलेल्या चक्रीवादळ आणि मुसळधार पावसाने झालेल्या भूस्खलनामुळे मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या आता २३० वर पोचली आहे. तसेच व्हिएतनाम येथील आपत्तीव्यवस्थापनच्या अधिकाऱ्यांनी दक्षिण कोस्ट येथील लाखो लोकांना सुरक्षितस्थळी हलविण्यासाठी प्रयत्न सुरू केल्याचे सोमवारी (ता. २५) सांगितले.

आपत्ती व्यवस्थापनच्या अधिकाऱ्यांनी आतापर्यंत एकूण ७४ हजार लोकांना सुरक्षितस्थळी हलविले असून १५ शहरांत सुमारे दहा लाख लोकांनी हलविण्याच्या तयारीत आहेत. तेल रिगला धोक्याची सूचना देण्यात आली असून सुमारे ६२ हजार मच्छीमार नौकांना समुद्रात न जाण्याचा इशारा देण्यात आला आहे. व्हिएतनामला आपल्या तेल रिग आणि जहाजांची सुरक्षा प्राधान्याने करावी लागणार असून तेल कारखान्यांना बंद करून तेथील कामगारांना आवश्यकता भासल्यास बाहेर काढण्याच्या सूचना पंतप्रधान नग्युन झेओन फुक यांनी सांगितले आहे.

वादळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर दक्षिणेकडून वाणिज्यिक शहर असलेल्या हो ची मिन्ह शहरातील शाळा बंद ठेवण्याचा आदेश देण्यात आला आहे. या वादळाचा फटका रविवारी दक्षिण चीनच्या समुद्रातील स्प्रॅटली आयलंडला फटका बसला आहे. फिलिपाईन्सप्रमाणे व्हिएतनामलादेखील नेहमीच वादळाचा फटका बसत असतो.

# कापूस उत्पादनवाढीला खोडा

## भारत, ऑस्ट्रेलिया, पाकिस्तानच्या उत्पादनात घटीचा परिणाम

**मुंबई (कोजेन्सेस वृत्तसेवा) :** भारत, ऑस्ट्रेलिया, पाकिस्तानच्या कापूस उत्पादनात घटीच्या परिणामामुळे जागतिक कापूस उत्पादनात घट होणार आहे. जागतिक कापूस उत्पादन २५.९७ दशलक्ष टनांवरून २५.८३ दशलक्ष टन राहणार आहे, असा अंदाज इंग्लंड येथील कॉटल आउटलुक या संस्थेने वर्तविला आहे.

कॉटन आउटलुकने नुकताच जागतिक व्यापाराचा मासिक अहवाल प्रसिद्ध केला आहे. या अहवालात जगातील महत्त्वाच्या कापूस उत्पादक देशांमधील कापूस उत्पादनाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. भारतात २०१७-१८ (ऑगस्ट ते जुलै) या वर्षात कापसाचे सुमारे ६.३८ दशलक्ष टन उत्पादन होण्याचा अंदाज इंग्लंड येथील कॉटल आउटलुक या संस्थेने वर्तविला आहे. या आधी प्रसिद्ध केलेल्या अंदाजाच्या तुलनेत हे उत्पादन कमी असून, याआधी देशात ६.४६ दशलक्ष टन उत्पादन झाले आहे.

या संस्थेने जागतिक स्तरावरील कापूस उत्पादनाचा अंदाज वर्तविला असून, या वर्षात जगभरात एकूण २५.८३ दशलक्ष टन कापसाचे उत्पादन होईल, असे मासिक अहवालात सांगण्यात आले आहे. याआधी जागतिक पातळीवर एकूण २५.९७ दशलक्ष टन कापसाचे उत्पादन होईल असा अंदाज व्यक्त करण्यात आला होता. भारतात काही ठिकाणी पडलेला दुष्काळ तसेच महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश, हरियाना, पंजाब या राज्यांमध्ये गुलाबी बोंड अळीच्या प्रादुर्भावामुळे उत्पादनात घट आली आहे. परिणामी देशातील कापूस उत्पादनात यंदा सुमारे ८५ हजार टन उत्पादनाची घट येण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. पाकिस्तान आणि ऑस्ट्रेलियातदेखील हीच स्थिती असून, तेथे अनुक्रमे एक लाख आणि ७५ हजार टनाने कापूस उत्पादनात घटीचा अंदाज वर्तविण्यात आले आहे. तर अमेरिकेतील कापूस उत्पादन या वर्षी ३ हजार टनांनी वाढले असून, एकूण उत्पादन ४.६५ दशलक्ष टन घेण्यात आले.

कॉटन आउटलुक हे जागतिक स्तरावरील कापूस उत्पादन, मूल्य आणि त्या संदर्भातील वृत्त प्रसिद्ध करणारी संस्था आहे. या संस्थेच्या वतीने जागतिक स्तरावरील कापूससाठ्यासंदर्भातील माहिती अपडेट करण्यात आली आहे. तसेच कॉटन आउटलुकने जागतिक कापूस साठाही आता २ लाख ५८ हजार टनांवर पोचला अल्याचे नमूद केले आहे. आधीच्या अहवालात ७ लाख ८९ हजार टन जागतिक कापूससाठा असल्याचे नमूद केले होते. तसेच या संस्थेने जागतिक कापूसवापर हा २५.५७ दशलक्ष टन होईल असा अंदाज व्यक्त केला होता. यापूर्वीच्या अहवालात जागतिक कापूसवापर २५.१८ दशलक्ष टन होईल, असा अंदाज व्यक्त केला होता.

### जागतिक कापूस उत्पादन (दशलक्ष टनांत)




**स्रोत** : जागतिक कापूस सल्लागार समिती (आयसीएसी)

### भारतात उत्पादन ८५ हजार टनांनी घटणार

कॉटन आउटलुकने प्रकाशित केलेल्या सुधारित अंदाजानुसार भारतात यंदा ६.३८ दशलक्ष टन उत्पादन होणार आहे. या आधी ६.४६ दशलक्ष टन उत्पादनाचा अंदाज व्यक्त केला होता. सुधारित अंदाजात उत्पादनात यंदा सुमारे ८५ हजार टन उत्पादनाची घट येण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. तसेच पाकिस्तानमध्ये एक लाख टन आणि ऑस्ट्रेलियात ७५ हजार टन उत्पादन घटीचा अंदाज व्यक्त केला आहे.






## कुलभूषण जाधव यांची आई, पत्नीसोबत भेट

**नवी दिल्ली :** कथित हेरगिरीप्रकरणी पाकिस्तानात शिक्षा भोगत असलेले भारतीय नौदलाचे माजी अधिकारी कुलभूषण जाधव यांच्या आई आणि पत्नीने सोमवारी (ता. २५) पाकिस्तानच्या परराष्ट्र विभागात त्यांची भेट घेतली. कुलभूषण जाधव यांना भेटण्यासाठी त्यांच्या आईने पाकिस्तान सरकारकडे व्हिसासाठी अर्ज केला होता. यासाठी परराष्ट्रमंत्री सुषमा स्वराज यांनीदेखील विशेष लक्ष घातले होते. त्यानंतर आई आणि पत्नीला भेटण्याबाबत पाकिस्तान सरकारने सकारात्मक भूमिका घेतल्याचे सांगण्यात आले होते.

### बस नदीत कोसळून ३३ ठार

**जयपूर :** राजस्थानातील सवाई माधोपूर जिल्ह्यात प्रवाशांना घेऊन जाणारी बस नदीत कोसळून झालेल्या भीषण अपघातात ३३ जण मृत्युमुखी पडले असून, सात जण जखमी झाल्याचे सांगण्यात आले. मृत्युमुखी पडलेल्यांमध्ये सात महिला आणि चार लहान मुलांचा समावेश आहे.

# Logo appearance

# in Event Promotion Advt in Agrowon

All Edition Common



## विजय रूपानी दुसऱ्यांदा गुजरातच्या मुख्यमंत्रिपदी



**अहमदाबाद, गुजरात** : सलग सहाव्यांदा गुजरात जिंकणाऱ्या भाजपने पुन्हा एकदा मुख्यमंत्रिपदासाठी विजय रूपानी यांना संधी दिली आहे. रूपानी यांनी दुसऱ्यांदा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. नितीन पटेल हेदेखील उपमुख्यमंत्रिपदी कायम राहिले. दरम्यान, पंतप्रधान मोदी यांनी या ठिकाणी पोचण्यापूर्वी विमानतळापासून सचिवालयापर्यंत रोड शो केला.

गांधीनगर येथे एका भव्य कार्यक्रमात विजय रूपानी यांना शपथ देण्यात आली. या समारंभाला पंतप्रधान नरेंद्र मोदी, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष अमित शहा, भाजपशासित राज्यांचे मुख्यमंत्री, काही केंद्रीय मंत्री उपस्थित होते.

भाजपचे प्रदेशाध्यक्ष जितू वाघानी यांच्या अध्यक्षतेखाली नवनिर्वाचित आमदारांच्या बैठकीमध्ये रूपानी यांची विधिमंडळ नेतेपदी निवड करण्यात आली होती. राज्यपाल ओ. पी. कोहली यांनी यांनी रूपानी यांना मुख्यमंत्रिपदाची शपथ दिली. गुजरातमध्ये नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपने ९९ जागा जिंकत बहुमत मिळविले होते.



**लानाओ डेल नॉर्ट, फिलिपिन्स : येथे सोमवारी (ता. २५) आलेल्या चक्रीवादळामुळे मोठ्या प्रमाणात जीवित तसेच वित्तहानी झाली आहे. शेतीलाही या वादळाचा फटका बसला असून, अनेक ठिकाणी वृक्ष उन्मळून पडले आहेत.**

## ब्राझीलच्या साखर उत्पादनात वाढ

### 'यूएनआयसीए'चा अहवाल; दक्षिण–मध्य प्रांताची आघाडी

**नवी दिल्ली (कोजेन्सिस वृत्तसेवा)** : दक्षिण-मध्य ब्राझीलमधील साखर कारखान्यांनी डिसेंबरच्या पंधरवाड्यात एकूण ५०६००० टन साखरेचे उत्पादन घेतले आहे. गेल्या वर्षात या कालावधीत येथे कारखान्यांनी ३७५००० टन साखर उत्पादित केली होती. तुलनेत यंदा ३४.८ टक्क्यांनी वाढ झाल्याचे साखर उद्योग संघटनेच्या (यूएनआयसीए) अहवालात म्हटले आहे.

साखर उत्पादन आणि निर्यात करण्यासाठी जागतिक पातळीवर ब्राझील आघाडीवर आहे. येथे साखरेचे उत्पादन एप्रिल ते मार्च या कालावधीत सुरू असते. दक्षिण मध्य ब्राझीलमध्ये कारखान्यात साखरेचे उत्पादन ऑक्टोबरपर्यंत सुरू असते. याच भागातून देशाच्या एकूण ९० टक्क्यांहून अधिक साखरेचे उत्पादन घेतले जाते.

एप्रिल-ऑक्टोबरमधील गळीत हंगामात (१ एप्रिल ते १५ डिसेंबर) ५७८.७६ दशलक्ष टन उसाचे गाळप करण्यात आले असून, यामध्ये वार्षिक १.७ टक्क्यांनी घसरण झाली. यामधून सुमारे ३५.५९ दशलक्ष टन साखरेचे उत्पादन झाले असून, हे मागील वर्षीच्या तुलनेत १.४ टक्क्यांनी वाढले आहे.

जागतिक इथेनॉल उत्पादनात ब्राझीलचा क्रमांक दुसरा आहे, तर एकूण जागतिक उत्पादनापैकी २० टक्के वाटा असून, जागतिक निर्यातीतही २० टक्के वाटा आहे. यंदाच्या हंगामात कारखान्यांनी २४.९६ अब्ज लिटर इथेनॉलचे उत्पादन केले असून, गेल्या वर्षी याच कालावधीत २४.७५ अब्ज लिटर निर्मिती झाली होती.

इथेनॉल उत्पादन

(उत्पादन : अब्ज लिटरमध्ये)

(आलेख : अप्रमाणित)




ब्राझीलमध्ये एकूण उस गाळपापैकी




ब्राझीलचे ऊसचित्र

(१ एप्रिल ते १५ डिसेंबरअखेरचे)




(गाळप, उत्पादन : दशलक्ष टनांत)




## पाकव्याप्त काश्मीरमध्ये भारतीय सैनिकांची कारवाई

**नवी दिल्ली :** गेल्या वर्षी पाकिस्तानी हद्दीत शिरून केलेल्या सर्जिकल स्ट्राइकनंतर सोमवारी रात्री भारतीय लष्कराने सीमेपलीकडे जाऊन आणखी एक मोठी कारवाई केली आहे. भारतीय लष्कराच्या या कारवाईत तीन पाकिस्तानी सैनिक ठार झाले असून, एक सैनिक जखमी झाला आहे.

काश्मीरच्या केरी सेक्टरमध्ये नुकतेच पाकिस्तानकडून शस्त्रसंधीचे उल्लंघन करण्यात आले होते. या वेळी पाकच्या गोळीबारात चार भारतीय जवान हुतात्मा झाले होते. या हल्ल्याला प्रत्युत्तर देण्यासाठी भारतीय सैन्याने पुन्हा एकदा पाकव्याप्त काश्मीरमध्ये शिरून यशस्वीपणे कारवाई केली. सूत्रांच्या माहितीनुसार, सोमवारी संध्याकाळच्या सुमारास भारतीय लष्कराचे एक विशेष पथक पुंछ सेक्टरमधून सीमारेषेपलीकडे गेले. येथून भारतीय जवानांनी पाकच्या रावळकोट सेक्टरमधील रुख चकरी परिसरात प्रवेश केला व त्या ठिकाणी गस्त घालत असलेल्या पाकिस्तानी सैनिकांना कंठस्नान घातले.

# Logo appearance
# in Event Promotion Advt in Agrowon

All Edition Common





## तारिक अन्वर रुग्णालयात



नवी दिल्ली : माजी केंद्रीय मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (एनसीपी) खासदार तारिक अन्वर यांची प्रकृती अचानक बिघडल्यामुळे त्यांना उपचारांसाठी मंगळवारी (ता. २६) एअर अँब्युलन्सने दिल्लीत हलविण्यात आल्याची माहिती पक्षाच्या प्रवक्त्याने दिली. 'राष्ट्रवादी'चे सरचिटणीस असलेले अन्वर (वय ६६) यांची प्रकृती सोमवारी बिहारमधील कटिहार येथे असताना अचानक बिघडली. कटिहारहून ते पाटण्याला जाणार होते, मात्र, तब्बेत बिघडल्यामुळे त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांचा नियोजित दौरा रद्द करण्यात आला आहे..

## कुलभूषण यांच्या वैद्यकीय अहवालावर प्रश्न



नवी दिल्ली : हेरगिरीच्या आरोपाखाली पाकिस्तानने कैदेत असलेले भारताचे निवृत्त नौदल अधिकारी कुलभूषण जाधव यांचा वैद्यकीय अहवाल खोटा असल्याचे समोर येत आहे. पाकिस्तानने दुबईतील सौदी जर्मन हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी हा अहवाल दिल्याचा दावा केला आहे. हेरगिरी आणि घातपाती कारवायांप्रकरणी पाकिस्तानने कुलभूषण जाधव यांना फाशीची शिक्षा सुनावली आहे. सध्या जाधव हे पाकच्या कैदेत असून, सोमवारी (ता. २५) जाधव यांच्या पत्नी आणि आईने त्यांची भेट घेतली. या भेटीनंतर पाकिस्तानने कुलभूषण जाधव यांचा वैद्यकीय अहवाल जाहीर केला होता. प्रत्यक्षात रुग्णालय प्रशासनाने एका खासगी वृत्तवाहिनीशी बोलताना आमच्या रेकॉर्डमध्ये कुलभूषण जाधव नावाचा रुग्णच नाही, असे म्हटले आहे.

# सूतनिर्यातीत दहा टक्क्यांनी घट

## चीनकडून कमी मागणीचा परिणाम; प्रोत्साहनपर धोरणांची गरज

**कोईम्बतूर, तमिळनाडू :** एप्रिल ते सप्टेंबर या कालावधीत देशातून ४६४ दशलक्ष किलो सूत निर्यात झाले असून गेल्या वर्षीच्या तुलनेत सुमारे दहा टक्क्यांनी घट झाली आहे. भारतीय सूताला चीनकडून मागणी कमी झाल्याने मोठा फटका बसत असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

केंद्रीय वाणिज्य मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार चीनला होणारी भारतीय सूत निर्यात ही मूल्य आणि आकार या दोन्ही बाबतीत कमी झाली आहे. एप्रिल ते डिसेंबर या कालावधीत चीनला १०५.९ दशलक्ष किलो सूत जहाजाद्वारे पाठविण्यात आले आहे. २०१३-१४ मध्ये सूती धागा निर्याताने ४.५ अब्ज डॉलर्सचा विक्रमी टप्पा ओलांडला



होता. या काळात स्पिनिंग मिल्समध्ये २ टक्के वाढीची निर्यात प्रोत्साहन, २ टक्के व्याज सुविधेसह आणि ३ टक्के फोकस मार्केट प्रोत्साहन यासह विविध सवलतींमुळे निर्यातीला लाभ झाला होता.

तथापि, २०१४ मध्ये कापूस बाजाराला देण्यात येणारी निर्यात प्रोत्साहन योजना काढून घेण्यात आली. यामुळे २०१६ मध्ये धागा निर्यात घटून घटून 3.3 अब्ज डॉलरवर आली. सीआयटीआयचे अध्यक्ष संजय कुमार जैन याविषयी म्हणाले, की या धोरणाचा फटका भारताचा सर्वात मोठा सूत आयातदार असलेल्या चीनद्वारे मागणी कमी केल्याने

> “ केंद्राने घेतलेल्या काही धोरणांचा सूत निर्यातीवर प्रतिकूल परिणाम झाला आहे. व्हिएतनाम आणि इंडोनेशियात आयातशुल्क नसल्याने चीनने भारतीय सूत आयात करण्याऐवजी आपला मोर्चा तिकडे वळविला आहे.
>
> – **संजय कुमार जैन,** अध्यक्ष, कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन टेक्सटाईल इंडस्ट्री

बसला आहे. २०१३-१४ ते २०१६-१७ या कालावधीत चीनला होणारी भारतातील कापूस सूत निर्यात ४२ टक्क्यांनी घटली आहे, तर व्हिएतनाम व इंडोनेशियाची निर्यात या कालावधीत मात्र अनुक्रमे ८३% आणि १४% वाढली.

## जयराम ठाकूर हिमाचलच्या मुख्यमंत्रिपदी



**शिमला, हिमाचल प्रदेश :** भाजप नेते जयराम ठाकूर बुधवारी (ता. २७) मुख्यमंत्रिपदी विराजमान झाले आहेत. राज्यपाल आचार्य देव व्रत यांनी ठाकूर यांच्यासह इतर दहा जणांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. ठाकूर हे हिमाचल प्रदेशचे सहावे मुख्यमंत्री असतील.

शिमल्यातील रिज मैदान येथे हा शपथविधी सोहळा पार पडला. या वेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी, माजी उपपंतप्रधान लालकृष्ण अडवानी, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष अमित शहा, केंद्रीय गृहमंत्री राजनाथसिंह, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यासह अनेक केंद्रीय मंत्री आणि इतर राज्यांतील मुख्यमंत्री या शपथविधी सोहळ्याला उपस्थित होते.



ईरी, पेन्सिल्व्हानिया : येथे मंगळवारी (ता. २६) विक्रमी हिमवृष्टी झाल्याचे क्लेव्हलँड येथील राष्ट्रीय हवामान केंद्राने सांगितले आहे. चक्रीवादळामुळे येथे सुमारे ३४ इंच बर्फ पडला असून त्यातून मार्ग काढताना महिला.

# ट्रिपल तलाकचे विधेयक आज संसदेत




**नवी दिल्ली :** मुस्लिम समाजामध्ये प्रचलित असलेली ''ट्रिपल तलाक''ची प्रथा हा फौजदारी गुन्हा ठरवून त्यासाठी पतीला तीन वर्षांच्या कारावासाच्या शिक्षेची तरतूद करणाऱ्या प्रस्तावित कायद्याचे विधेयक गुरुवारी (ता. २८) लोकसभेत मांडले जाणार आहे.

या कायद्यात तलाक देण्यात आलेल्या महिलेला व तिच्या मुलांना पोटगी देण्याचीही तरतूद आहे. सर्वोच्च न्यायालयाने ट्रिपल तलाक बेकायदा ठरवूनही तो सुरूच असल्याने हा कायदा करण्यात येत आहे. हा नवा कायदा अस्तित्वात आल्यानंतर पत्नीला तोंडी तलाक देण्याचा प्रयत्न केल्यास गुन्हा दाखल होऊन त्याला तुरुंगवास भोगावा लागणार आहे. कारण ट्रिपल तलाक दिल्यास तीन वर्षांपर्यंत शिक्षेची तरतूद यामध्ये आहे.

कायदामंत्री रविशंकर प्रसाद हे विधेयक संसदेत सादर करतील. या विधेयकांतर्गत बोलून, लिहून, ई-मेल, मेसेज किंवा व्हॉट्सॲपद्वारे यानुसार कोणत्याही पद्धतीने दिला गेलेला ट्रिपल तलाक बेकायदा व अमान्य असेल आणि कायद्यानुसार संबंधित पतीला ३ वर्षांच्या कारावासाची शिक्षा होऊ शकते.



# Logo appearance
# in Event Promotion Advt in Agrowon

only Nagpur


सकाळ
www.agrowon.com
ॲग्रोवन
मित्र ग्लोबल शिवाराचा..

ॲग्रोवन स्मार्ट ॲवॉर्डस् २०१७
पान ९
ज्योतीने तेजाची आरती
श्रीमती ज्योती देशमुख

४० वर्षांचा विश्वास...
महागुजरात सिड्स नागपूर
रिसर्च टोमॅटो
सम्राट - १८
• भरपूर उत्पादन
• जास्त दिवस टिकणारे
• वजनात भारी
RESEARCH TOMATO SAMRAT-18
संपर्क : ०७१२-२७२२२६८, २७२२२६९

नागपूर शुक्रवार, २९ डिसेंबर २०१७ । पाने १६ । किंमत ₹ ३ । www.epaper.agrowon.com पुणे, कोल्हापूर, नाशिक, मुंबई, औरंगाबाद, सोलापूर, नागपूर, जळगाव, नांदेड, अकोला येथून प्रसिद्ध

सकाळ

ॲग्रोवन

## कोण होणार ॲग्रोवन महाराष्ट्राचा स्मार्ट शेतकरी?

ॲग्रोवन प्रेरणा ॲवॉर्ड
श्रीमती ज्योती संतोष देशमुख
कटयार (अकोला)

ॲग्रोवन स्मार्ट महिला शेतकरी ॲवॉर्ड
सौ. विद्या बाबूराव रुद्राक्ष
डिघोळअंबा (बीड)

ॲग्रोवन स्मार्ट कृषी उद्योजक ॲवॉर्ड
श्री. विकास दत्तात्रय दांगट
सिंहगड रोड (पुणे)

ॲग्रोवन स्मार्ट कृषिपूरक व्यवसाय ॲवॉर्ड
श्री. पृथ्वीराज दिलीप चव्हाण
विठ्ठलवाडी (सातारा)

ॲग्रोवन स्मार्ट सेंद्रिय शेती ॲवॉर्ड
श्री. प्रभाकर भिला चौधरी
सुभाषनगर (धुळे)

ॲग्रोवन विदर्भाचा स्मार्ट शेतकरी ॲवॉर्ड
श्री. मोहन तेजराव जगताप
वळती (बुलडाणा)

ॲग्रोवन पश्चिम महाराष्ट्राचा स्मार्ट शेतकरी ॲवॉर्ड
श्री. तानाजी चिंतामणी हाके
खर्डी (सोलापूर)

ॲग्रोवन उत्तर महाराष्ट्राचा स्मार्ट शेतकरी ॲवॉर्ड
श्री. नाना भाऊसिंग पाटील
पिंप्री खुर्द (जळगाव)

ॲग्रोवन मराठवाड्याचा स्मार्ट शेतकरी ॲवॉर्ड
श्री. रवींद्र भानुदास देवरवाडे
देवळा (बीड)

ॲग्रोवन कोकणचा स्मार्ट शेतकरी ॲवॉर्ड
श्री. रामचंद्र रघुनाथ सावे
चिंचणी (पालघर)

ॲग्रोवन स्मार्ट ॲवॉर्डस् २०१७

जे हात मातीत राबतात, तेच हात आज पुरस्कारही घेतील...

ॲग्रोवनचा
दिमाखदार भव्य गौरव सोहळा!

~ पुरस्कार वितरण ~
आज दिनांक : २९ डिसेंबर, वेळ : सायंकाळी ४ ते ७
स्थळ : टिळक स्मारक मंदिर, टिळक रोड, पुणे
आवर्जून या!

*प्रथम येणाऱ्यास प्राधान्य आणि काही जागा राखीव

प्रायोजक

सोनाई पशु आहार | UPL | जैन इरिगेशन सिस्टीम्स लि. कल्पना कणापरी. ब्रह्मांडाचा भेद करी. | महाधन एक अतूट नातं! | बँक ऑफ महाराष्ट्र Bank of Maharashtra भारत सरकार का उद्यम एक परिवार एक बँक | ओरिएण्टल इंश्योरेंस Oriental insurance | चौधरी यात्रा कंपनी प्रा.लि.

# Logo appearance in Event Promotion Advt in Sakal - served 3)


पिंपरी-चिंचवड TODAY

सुविचार
खोटा मान सोडा म्हणजे तुम्हाला काहीही कमी पडणार नाही.

सकाळ
पुणे, बुधवार
२७ डिसेंबर २०१७
३




महालक्ष्मी लॉन्स, कर्वेनगर, पुणे : 'सकाळ खाऊ गल्ली सीझन ५'मध्ये खास ख्रिसमसनिमित्त 'डब्ल्यू एस बेकर्स'ने सहा फुटी केक ठेवला होता. खाद्यजत्रेत हा केक आकर्षण ठरला.

## जेजुरीच्या प्रमुख विश्वस्तपदी लोंढा

## फुले दांपत्य सन्मान दिनानिमित्त पुण्यामध्ये एक जानेवारीला रॅली

## एल्गार परिषद प्रसंगी रस्त्यावर

### कबीर कला मंचच्या ज्योती जगताप यांचा इशारा

**ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड'चे सचिव मौलाना अब्दुल हमीद अजहरी हेही परिषदेत आपले मत मांडणार आहेत. ते त्यांची भूमिका मांडणार असल्याने यात काही गैर नाही. या परिषदेला विरोध असला तरी, आम्ही संविधानाचे महत्त्व त्यातून पोचवणार आहोत.**
- ज्योती जगताप

### व्हॉट्सॲप न्यूज ७०२१९७४४४७



**चिंचवडच्या आठवडे बाजारात अतिक्रमण**



**पादचारी मार्गावरील झाडे-झुडपे हटवा**

## ओडिसी नृत्य हे शिल्पाकृतीसारखे

### मुद्‌गल यांचे मत; 'गांधर्व'च्या संगीत समारोहाचा समारोप

## सम्यक साहित्य संमेलन अकरा जानेवारीपासून

## 'स्पर्धा परीक्षांमध्ये मराठी टक्का वाढतोय'


Since 1977

CELEBRATING 40 YEARS OF VISION

40 साल का शानदार सफर
और अब
कल पर नजर

19 डिसेंबर 1977 रोजी सुरु झाली आमची नैपुण्याच्या दिशेने सफल वाटचाल आणि ह्याचं श्रेय जातं 40 वर्षं आम्हाला संपन्न वाटचालीची प्रेरणा देणाऱ्या तुमच्या सहयोगाला. आमच्या सेवेवर तुम्ही दाखवलेल्या विश्वासाचं आमच्या सफलतेमध्ये मोलाचं योगदान आहे. तुमच्या सेवेसाठी आम्ही सदैव कटिबद्ध आहोत, हे सांगताना आम्हाला अतीव आनंद होत आहे. आज आमच्या नजरेसमोर आहे उज्वल भावी काळ आणि आमच्या कटिबद्धतेचा आम्ही करत आहोत पुनरुच्चार. आम्ही तुम्हाला ह्यापुढेही देत राहू अत्युत्तम ग्राहक सेवा, नेत्रनिगेसाठी उत्तमोत्तम प्रॉडक्ट्स, अत्याधुनिक टेक्नॉलॉजी, फॅशन आणि तसंच तुम्हाला साजेसं सारं काही.

GANGAR EYENATION



022-24195555

मुंबई | पुणे | नाशिक | औरंगाबाद | सांगली | सोलापूर | नागपूर | रत्नागिरी | कोल्हापूर | अहमदाबाद | आणंद | सुरत | नवसारी | वडोदरा | गांधीनगर | गांधीधाम | भुज | राजकोट | जामनगर

सकाळ
सन्मान शेतकऱ्यांचा, अभिमान महाराष्ट्राचा!

ॲग्रोवन

आता महाराष्ट्रापुढे येतील, राज्यातले स्मार्ट शेतकरी !

ॲग्रोवनचा दिमाखदार भव्य गौरव सोहळा!

पुरस्कार वितरण
दिनांक : २९ डिसेंबर २०१७
स्थळ : टिळक स्मारक मंदिर, टिळक रोड, पुणे
वेळ : सायंकाळी ४ ते ७
आवर्जून या!

शेती उद्योगात मोठ्या कष्टानं आपलं वेगळं स्थान निर्माण करणाऱ्या शेतकऱ्यांना सन्मानित करणारा ॲग्रोवनचा भव्य सोहळा !

ॲग्रोवन स्मार्ट ॲवॉर्ड्स २०१७

प्रायोजक
सोनाई
UPL
महाधन
बँक ऑफ महाराष्ट्र
Oriental Insurance
चौधरी

# Logo appearance in Event Promotion Advt in Sakal



TODAY पुणे

एसएमएस
तुम्ही जसे आहात तसेच राहा...
कारण, 'ओरिजिनल'ची किंमत नेहमीच 'कॉपी'पेक्षा जास्त असते.

निवडक लेख, बातम्या मिळवा व्हॉट्सॲपवर!
आपला मोबाईल नंबर SMS ने नोंदवा
9922421511

सकाळ
पुणे, गुरुवार २८ डिसेंबर २०१७
३

# सत्ता राखण्यास नेत्यांना यश

## ग्रामपंचायत निवडणुकीत सरपंचपदी तरुणांना संधी; काही ठिकाणी प्रस्थापितांना धक्का

### काटेवाडीत राष्ट्रवादीचाच झेंडा!

### 'विकासकामांचा विजय'

बारामती : तालुक्यातील ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या काटेवाडीसह इतरही ग्रामपंचायतींवर राष्ट्रवादी काँग्रेसने विजय संपादन केल्याचे जाहीर होताच कार्यकर्त्यांनी केलेला जल्लोष.

'सकाळ संवाद' डाउनलोड करा...

व्हॉट्सॲपवरही बातमी पाठवा ९१३००८८४५९

# पॅनेल जिंकले; सरपंचपद गमावले

## वाघोली ग्रामपंचायत निवडणुकीत 'ग्रामविकास'ची बाजी

वाघोली : ग्रामपंचायत निवडणुकीत विजय मिळविल्यानंतर जल्लोष करताना 'ग्रामविकास'चे कार्यकर्ते.

रस्त्यावरील गाड्या हटवा

जरब बसेल असा दंड लावा

नागरिकांची सर्रास लूट

प्राथमिक उपचाराचे धडे

अनधिकृत होर्डिंग्जचा सुळसुळाट

अपघात टाळण्यासाठी स्वयंशिस्त पाळा

# निकालापूर्वीच फ्लेक्स!

त्वचाविकार

ॐकार आयुर्वेद डॉ.सत्यन गुजर

केसांच्या समस्या वेळीच थांबवा!

हेअर डॉक हेअर क्लिनिक

सकाळ

सन्मान शेतकऱ्याचा, अभिमान महाराष्ट्राचा!

अॅग्रोवन स्मार्ट अॅवॉर्ड्स २०१७

शेतात घाम गाळून पीक घेणाऱ्या शेतकऱ्यांच्या कष्टांची दखल घेत, त्यांना सन्मानित करणारा दिमाखदार भव्य सोहळा!

पुरस्कार वितरण

दिनांक : २९ डिसेंबर २०१७

स्थळ : टिळक स्मारक मंदिर, टिळक रोड, पुणे

वेळ : सायंकाळी ४ ते ७

आवर्जून या!

या कलाकारांच्या संगतीत रंगणार अॅग्रोवन पुरस्कार सोहळा!

प्रायोजक

सोनाई

UPL

ओरिएन्टल इन्शुरन्स

# Logo appearance
# in Event Promotion Advt in Sakal



TODAY पुणे शहर

आजच्या स्पर्धा

- आगाखान करंडक हॉकी स्पर्धा : मेजर ध्यानचंद पॉलिग्रास मैदान, नेहरूनगर.
- राष्ट्रीय मानांकन टेनिस स्पर्धा : हिल साइड जिमखाना टेनिस कोर्ट, बिबवेवाडी
- जिल्हास्तरीय बॅडमिंटन स्पर्धा : पीवायसी क्लब, बॅडमिंटन कोर्ट
- चौदा वर्षाखालील लिटिल मास्टर्स करंडक क्रिकेट स्पर्धा : धायरी
- लायन्स करंडक टी-२० क्रिकेट स्पर्धा : डेक्कन जिमखाना क्लब
- रॉक २७ साखळी क्रिकेट स्पर्धा : एनसीएल, पाषाण

सकाळ पुणे, शुक्रवार २९ डिसेंबर २०१७ ८

Date of Publication : शुक्रवार २९ डिसेंबर २०१७ • Posted at Market yard PSO Pune Daily.

श्रीगुरू बालाजी तांबे

## सार्थकची अनय विंझेवर मात

जिल्हास्तरीय बॅडमिंटन स्पर्धा

## डेक्कन इलेव्हन, डेक्कन जिमखानाची प्रतिस्पर्ध्यांवर मात

लिटिल मास्टर्स करंडक क्रिकेट स्पर्धा

कृष्णा देवतासे ओम घोडके

## कोक इन कॅन संघाचा विजय

राज्य अजिंक्यपद बास्केटबॉल स्पर्धा

## रत्नागिरी, कोल्हापूर, नाशिक, पालघर संघांची विजयी सलामी

## जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा आजपासून

तुम्हाला कधीही निराश नाही करणार..

वीटा-एक्स गोल्ड


सकाळ ॲग्रोवन

## कोण होणार ॲग्रोवन महाराष्ट्राचा स्मार्ट शेतकरी?

ॲग्रोवन प्रेरणा ॲवॉर्ड — श्रीमती ज्योती संतोष देशमुख, कटयार (अकोला)

ॲग्रोवन स्मार्ट महिला शेतकरी ॲवॉर्ड — सौ. विद्या बाबूराव रुद्राक्ष, शिरोळ (बीड)

ॲग्रोवन स्मार्ट कृषी उद्योजक ॲवॉर्ड — श्री. विकास दत्तात्रय दांगट, सिंहगड रोड (पुणे)

ॲग्रोवन स्मार्ट कृषिपूरक व्यवसाय ॲवॉर्ड — श्री. पृथ्वीराज दिलीप चव्हाण, विठ्ठलवाडी (सातारा)

ॲग्रोवन स्मार्ट सेंद्रिय शेती ॲवॉर्ड — श्री. प्रभाकर भिला चौधरी, सुभाषनगर (धुळे)

ॲग्रोवन विदर्भाचा स्मार्ट शेतकरी ॲवॉर्ड — श्री. मोहन तेजराव जगताप, वळती (बुलडाणा)

ॲग्रोवन पश्चिम महाराष्ट्राचा स्मार्ट शेतकरी ॲवॉर्ड — श्री. तानाजी चिंतामणी हाके, खर्डी (सोलापूर)

ॲग्रोवन उत्तर महाराष्ट्राचा स्मार्ट शेतकरी ॲवॉर्ड — श्री. नाना भाऊसिंग पाटील, पिंप्री खुर्द (जळगाव)

ॲग्रोवन मराठवाड्याचा स्मार्ट शेतकरी ॲवॉर्ड — श्री. रवींद्र भानुदास देवरवडे, देवळा (बीड)

ॲग्रोवन कोकणचा स्मार्ट शेतकरी ॲवॉर्ड — श्री. रामचंद्र रघुनाथ सावे, चिंचणी (पालघर)

ॲग्रोवन स्मार्ट ॲवॉर्ड्स २०१७

जे हात मातीत राबतात, तेच हात आज पुरस्कारही घेतील...

ॲग्रोवनचा दिमाखदार भव्य गौरव सोहळा!

पुरस्कार वितरण

आज दिनांक : २९ डिसेंबर, वेळ : सायंकाळी ४ ते ७

स्थळ : टिळक स्मारक मंदिर, टिळक रोड, पुणे

आवर्जून या!

*प्रथम येणाऱ्यास प्राधान्य आणि काही जागा राखीव

प्रायोजक

सोनाई पशु आहार · UPL · जैन इरिगेशन सिस्टीम्स लि. · महाधन · बँक ऑफ महाराष्ट्र Bank of Maharashtra · ॲग्रोवन स्मार्ट ॲवॉर्ड्स · Oriental Insurance · चौधरी यात्रा कंपनी प्रा.लि.

# Company personnel quote appearance in Award Winner Story in Agrowon (Logo Served 11 Times)



ॲग्रोवन स्मार्ट ॲवॉर्ड्स २०१७

**ॲग्रोवन स्मार्ट महिला शेतकरी ॲवॉर्ड : विद्या बाबूराव रुद्राक्ष, डिघोळअंबा, जि. बीड**

## विद्याताईंनी घेतला एकात्मिक शेतीविकासाचा ध्यास



**हिंमत असली की किंमत होते असं म्हणतात. डिघोळअंबा (ता. अंबाजोगाई, जि. बीड) येथील विद्याताई बाबूराव रुद्राक्ष त्यापैकीच एक. सूक्ष्मजीवशास्त्रातील पदवीचा उपयोग त्यांनी शेती सुधारणा आणि मुलांना शिकविण्यासाठी केला. त्याचा परिणाम म्हणजे अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतील शेती शाश्वत करत, प्रक्रियेच्या माध्यमातून उत्पादित शेतमालाला अपेक्षित दरही मिळवून दिला आणि मुलांना आयटीपर्यंतचे शिक्षणही दिले.**



घरच्या शेतीमध्ये महिलांसोबत काम करण्यात रमलेल्या (डावीकडून दुसऱ्या) विद्याताई रूद्राक्ष.

सन १९९३ पासून शेतीत उतरलेल्या डिघोळअंबा (ता. अंबाजोगाई, जि. बीड) येथील विद्या रुद्राक्ष यांचे पती कोकण विभागात कृषी खात्यात सेवेत होते. कोकणपट्टीतील हवामान मुले आणि त्यांना न मानवल्यामुळे त्यांनी स्वत:च्या गावी म्हणजेच डिघोळअंबा येथे येऊन शेती करण्याचा निर्णय घेतला. मुलांनी गावातील जिल्हा परिषदेच्या शाळेत प्रवेश घेतला. विद्याताईंनी आपल्या शिक्षणाचा उपयोग शेती आणि मुलांच्या शिक्षणासाठी करणे सुरू केले. पारंपरिक शेती करताना भरपूर पीक उत्पादनासाठी रासायनिक खते, कीटकनाशके यांचा अनियंत्रित वापर केला. परंतु या शेतीत उत्पादन खर्च आणि उत्पन्नाचा ताळमेळ बसत नसल्याचे पाहून त्यांनी शेतीच्या पद्धतीत बदल करण्याचे ठरविले.

रुद्राक्ष यांची पंधरा एकर शेती आहे. पहिल्यांदा शेणखताच्या उपलब्धतेसाठी जनावरे वाढविली. जमीन सुपीक बनविण्यासाठी शेणखताचा जास्तीत जास्त वापर सुरू केला. गांडूळ खत निर्मिती, कीटकनाशक म्हणून गोमूत्र आणि कडुनिंब पाल्याचा वापर सुरू केला. ताग, धैंचा यांसारखी हिरवळीची पिके जमिनीत गाडली. शेतीतील काडीकचरा न जाळता त्याचा फळझाडांना आच्छादन म्हणून उपयोग सुरू केला. शेतशिवारात पडणाऱ्या पावसाचे पाणी जमिनीत मुरविण्यासाठी बांधबंदिस्ती केली. विहिरीतील पाण्याचा काटकसरीने वापर करण्यासाठी तुषार आणि ठिबक संचाचा वापर सुरू केला.

जमीन सुधारणा सुरू झाल्यानंतर विद्याताईंनी नव्याने पीक लागवडीचे नियोजन केले. चार एकरावर केसर आंब्याची १० बाय ५ मीटरवर लागवड केली. त्यामध्ये हळद, आले, सोयाबीन, ज्वारी, गहू, हरभरा, इत्यादी आंतरपिके घेऊन उत्पन्न वाढविण्यास सुरवात केली. जमिनीचे सशक्तीकरण, धूप थांबविणे, पाणी व्यवस्थापन, जनावरांचे व्यवस्थापन, बायोगॅसमधून ऊर्जानिर्मिती व ऊर्जा बचत, पीक संरक्षण, अन्न सुरक्षा, शेतीमालाचे मूल्यवर्धन, सामाजिक बांधीलकी, गुंतवणूक, पर्यावरण आदी बाबतीत केलेल्या परिणामकारक कामामुळे विद्याताई कार्यक्षम महिला शेतकरी म्हणून पुढे आल्या आहेत.

### शेती उत्पन्नातून बांधले घर

वाढलेल्या पीक उत्पादनातून बचत करत त्यांनी वडिलोपार्जित शेतीमध्ये छोटेसे घर बांधले. या घराच्या पाठीमागे जनावरांसाठी गोठा, पाण्याचा हौद, बायोगॅस, ट्रॅक्टर व शेतातील इतर अवजारे ठेवण्यासाठी शेड बांधली. जनावरांना लागणाऱ्या वैरणीसाठी जागा ठेवली. शेतपरिसरात आंबा, चिक्कू, डाळिंब, अंजीर, पेरू, सीताफळ, कागदी लिंबू, बदाम, केळी आदी फळझाडांची लागवड केली. यासोबतच घर परिसर सुशोभित करण्यासाठी गुलाब, मोगरा, रातराणी, शेवंती, पारिजातक, जुई, चाफा, निशीगंध आणि जास्वंद आदी फुलझाडांचीही लागवड केली.

### बचत गटातून महिलांना रोजगार

शेती व्यवस्थापनाचे काम करत असताना विद्याताई रुद्राक्ष यांनी १९९७ मध्ये डिघोळअंबा गावामध्ये कल्पना चावला महिला बचत गटाची स्थापना केली. वीस सदस्य असलेल्या महिला सुरवातीला ५० रुपये प्रतिमहिना आणि आता २०० रुपये प्रतिमहिनाप्रमाणे बचत करताहेत.

### प्रक्रिया उद्योग आणि थेट विक्रीतून मूल्यवर्धन

शेतामध्ये सेंद्रिय धान्य, कडधान्य व हळद उत्पादन होते. शेतमाल मूल्यवर्धनावर भर दिला. या माध्यमातून इतरांना रोजगार देण्याची तयारी केली. विद्याताईंनी हळद प्रक्रिया उद्योग सुरू केला. गहू, ज्वारीची थेट विक्री सुरू केली. कडधान्यापासून डाळी करून त्यांची वर्षभर विक्री सुरू झाली आहे. त्यामुळे चार महिलांना रोजगार मिळाला आहे.

### विशेष बाबी

- नोकरीमध्ये सात वर्षे शिल्लक असतानाही शेतीचे काम वाढल्याने २०१० मध्ये पतींना विद्याताईंनी स्वेच्छानिवृत्ती घेण्यास सांगितले. त्यानंतर शेतीविकासाचा आराखडा तयार करत पीक लागवड व्यवस्थापनाचे नियोजन राबवले.
- शिलकीतून ट्रॅक्टर घेतला. ट्रॅक्टरच्या उपलब्धतेमुळे त्यांनी गावाजवळील तळ्यातील सुमारे १००० ट्रॉली गाळ स्वतःच्या शेतीत मिसळला. त्यातून जमीन सुपिकता वाढविण्याचा प्रयत्न.
- जमिनीच्या उपलब्धतेनुसार हंगामी पिके आणि फळपिकांचे नियोजन.
- हळदीतील कुरकुमीन प्रमाण वाढविण्यासाठी प्रयत्न, प्रक्रिया उद्योगाला सुरवात.
- गावातील २० महिला बचत गटाची सुरवात. त्यातून प्रक्रिया उद्योगाला गती. शेती व शेतीपूरक उपक्रमामध्ये महिलांचा सहभाग वाढविण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न.
- खळद (जि. पुणे) येथील सेंद्रिय शेती अभ्यास गटाच्या सदस्या.
- २०१५ मध्ये पंजाबमधील चंडीगड येथील पाचव्या राष्ट्रीय सेंद्रिय शेती संमेलनाचे विशेष आमंत्रण.
- २०१५ मध्ये सेंद्रिय शेतीतील कार्यासाठी अंबाजोगाई कृषी विज्ञान केंद्राकडून सन्मानीत.
- २०१७ मध्ये राज्य शासनाकडून जिजामाता कृषिभूषण पुरस्कार.



जनावरांच्या संगोपनातून विद्याताईंना आनंद मिळतो.



विद्याताई रुद्राक्ष यांनी महिलांच्या सहकार्याने हळद प्रक्रिया उद्योग सुरू केला.



प्रतवारीसह पॅकेजिंग करत असलेल्या महिला.

प्रायोजक

सोनाई पशु आहार

UPL

जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि. कल्पना कणापरी. ब्रह्मांडाचा भेद करी.

महाधन एक अतूट नातं!

बैंक ऑफ महाराष्ट्र Bank of Maharashtra भारत सरकार का उद्यम एक परिवार एक बैंक

ओरिएण्टल इंश्योरेंस Oriental insurance

चौधरी यात्रा कंपनी प्रा.लि. कॉर्पोरेट ऑफीस - 276, एम. जी. रोड, नाशिक 2598871/72.

‘ॲग्रोवन स्मार्ट ॲवॉर्ड’ हा महाराष्ट्रातील कृषी क्षेत्राच्या विकासासाठी राबवलेला असा सकाळ माध्यम समूहाचा प्रामाणिक प्रयत्न आहे. राज्यातील उत्तम प्रयोग करणाऱ्या स्मार्ट शेतकऱ्यांचा गौरव करण्याच्या या प्रयत्नामध्ये यूपीएल लि. ही कंपनी सहभागी झालेली आहे.



– समीर टंडन,
विभागीय संचालक, भारत, यूपीएल लिमिटेड

## Free Stall At Event Venue




## Felicitation on Stage



# Company Article in Agrowon
# (2 Times)

१४ सकाळ अॅग्रोवन | शुक्रवार, २९ डिसेंबर २०१७ — अॅग्रो मार्केट

## पिकाच्या संरक्षणासाठी सिद्ध : यूपीएल लि

यूपीएल लि. ही पीक संरक्षण क्षेत्रातील कंपनी आहे. विविध कीड व रोगांपासून पिकाच्या संरक्षणासाठी अनेक उत्पादनांची निर्मिती केली जाते. त्यातील महत्त्वाची उत्पादने खालील प्रमाणे.

### अवान्सर ग्लो

अवान्सर ग्लो हे नवीन अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित आंतरप्रवाही व स्पर्शजन्य गुणधर्म असणारे बुरशीनाशक आहे. ते बुरशींच्या ऊर्जास्रोतावर हल्ला करून त्यांच्या श्वसन क्रियेमध्ये अडथळा निर्माण करते. बुरशीचे बीजांकुरण न झाल्याने डावणी, भुरी, करपा रोगापासून पिकाला उत्तम संरक्षण मिळत असून, राज्यामध्ये या वर्षी ४० हजार एकर क्षेत्रावर वापर झाल्याचा दावा कंपनीने केला आहे.

- जलद क्रियाशील - पावसाने धुऊन जात नाही.
- नवीन (WG) स्वरुपात उपलब्ध. पाण्यामध्ये जलद व पूर्णपणे विरघळते. एकसमान फवारणी शक्य होते.
- पानांचे आकारमान वाढवून उत्पादन वाढीला मदत करते.

### कुप्रोफीक्स

- हे पेटंटेड डिस्पर्स तंत्रज्ञानावर आधारीत WDG स्वरुपातील नवीन स्पर्शजन्य क्रियाशील बुरशीनाशक आहे. बुरशीच्या विविध सहा अंगावरती हल्ला करून नियंत्रण करते.
- पिकांवरील विविध रोग उदा. डाऊनी, भुरी, करपा, फुलगळ, फळगळ यासह जिवाणूजन्य रोगांचेही नियंत्रण करत असल्याचा कंपनीने दावा केला आहे. तसेच
- डिस्पर्स टेक्नॉलॉजी बुरशीनाशक फळावरती व पानांवरती संरक्षण कवच निर्माण करते.

### उलाला

हे आंतरप्रवाही व अंतरगामी क्रिया पद्धती असलेले एकमेव कीटकनाशक असून, फिडिंग ब्लॉकर म्हणून काम करते. फक्त ३० मिनिटांमध्ये किडींची रस शोषण क्रिया थांबवते. मावा, तुडतुडे व पांढरी माशी या तिन्ही किडींचे उत्कृष्ट नियंत्रण करते. पांढरी माशीच्या सर्व अवस्था नियंत्रित करत असल्याने दीर्घकाळ नियंत्रण मिळते. कमी मात्रा वापरावी लागत असून, वातावरणातील बदलाचा क्रियाशीलतेवरती परिणाम होत नसल्याचा दावा कंपनीने केला आहे.

### आयरिस

हे सोयाबीन व भुईमूग पिकातील उगवणीनंतर फवारण्याचे तणनाशक आहे. गवतवर्गीय व रुंद पानांच्या दोन्ही तणांवरती उत्कृष्ट नियंत्रण मिळते. मुख्य पिकांची वाढ खुंटत नाही. तणांच्या दोन ते पाच पानांच्या अवस्थेत फवारणी केल्यास मुख्य पिकाच्या उत्पादनामध्ये वाढ होत असल्याचा दावा कंपनीने केला आहे.

- त्वरित परिणामकारक व दीर्घकाळ नियंत्रण.
- वापरण्यास सोपे - वेगवेगळी रसायने एकत्र मिसळण्याची गरज नाही.

## सोनाईच्या पशुखाद्यामुळे वाढेल दूध उत्पादन

महाराष्ट्रामध्ये कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापर वाढला असून, दुग्ध उत्पादन क्षेत्रामध्येही वाढ झाली आहे. निसर्गाच्या लहरीवर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांना आर्थिक न्याय देण्यासाठी शेतकरी कुटुंबातील दशरथ माने यांनी २००२ मध्ये गोखळी (ता. इंदापूर) येथील सोनमाथ्यावर आपल्या सहकाऱ्यांसमवेत इंदापूर डेअरी अँड मिल्क प्रॉडक्टस्अंतर्गत सोनाई दूध संघाची स्थापना केली. फक्त १३ हजार लिटर दूध संकलनापासून सुरू झालेला संघाचा हा प्रवास माने यांच्या आत्मविश्वास, जिद्द व मेहनतीमुळे सुमारे १६ लाख लिटर दैनंदिन दूध संकलनापर्यंत पोचला आहे. देशातील अग्रगण्य दूध संघाने दूध संकलनानंतर तूप, दूध भुकटी आदी उपपदार्थ निर्मितीसह आता पशुखाद्यनिर्मिती प्रकल्पही सुरू केला. या प्रकल्पातून शेतकऱ्यांपर्यंत पोचलेल्या पशुखाद्यामुळे जनावरांचे दररोजचे दूध ३ ते ४ लिटरपर्यंत वाढत असून, दुधातील फॅट, एसएनएफ व प्रोटिन यांच्यामध्ये चांगली वाढ होते. चाकोरीबद्ध पशुखाद्यनिर्मिती संकल्पनेला फाटा देऊन सोनाईमध्ये उच्च गुणवत्तेच्या आधारावर पशुखाद्यनिर्मिती होते.

### पशुखाद्याचे फायदे

- सोनाईमार्फत डायमंड, दुग्धशक्ती व एक्स्ट्रा मिल्क ही उत्पादने तयार होतात.
- प्रति पशुधन प्रतिदिन ३ ते ४ लिटरपंत दुधामध्ये वाढ, दुधातील फॅट, एसएनएफ व प्रोटिनमध्ये वाढ, जनावरांचा भाकड काळ कमी होतो.
- दूधवाढीबरोबरच पशुधनाचे आर्युमानदेखील वाढत असल्याचा दावा सोनाई ग्रुपने केला आहे.

### प्रकल्पाची वैशिष्ट्ये

- सोनाई दूध संघाच्या पशुखाद्यनिर्मिती प्रकल्पाची क्षमता ५०० मे.टन प्रतिदिन आहे.
- संपूर्ण प्रकल्प स्वयंचलित आहे.
- प्रक्रियेदरम्यान पशुखाद्याची गुणवत्ता उत्तम राहण्यासाठी अत्याधुनिक यंत्रणा, स्वयंचलित नियंत्रण प्रणाली वापरली आहे. कच्च्या मालाच्या साठवणुकीसाठी आधुनिक पद्धतीचे गोदाम.
- कच्चा माल व उत्पादित पशुखाद्याची गुणवत्ता तपासण्यासाठी आधुनिक प्रयोगशाळा.
- जनावरांच्या शारीरिक गरजेसाठी आवश्यक फॅट, प्रोटिन, कार्बोहायड्रेट, व्हिटामिन व मिनरल्स या पोषकतत्त्वांनी परिपूर्ण व पचनीय आहे.

सकाळ अॅग्रोवन | अॅग्रो व्हिजन — मंगळवार, २३ जानेवारी २०१८ | १४

## 'यूपीएल'तर्फे धान्य साठवणीसाठी प्रशिक्षण सुरू

मार्केट ट्रेण्ड



यूपीएल कंपनीद्वारे अन्नधान्य साठवणीच्या शास्त्रीय पद्धतीविषयी प्रशिक्षण घेण्यात आले. त्या वेळी बोलताना कंपनीचे फ्युमिगेंट बिझनेस प्रमुख उज्ज्वलकुमार.

कृषी उत्पादनामध्ये वेगाने वाढ होत असली तरी साठवणीमध्ये धान्यांचे मोठे नुकसान होते. अन्न सुरक्षेसाठी काढणीनंतर अन्नधान्यांचे नुकसान रोखण्यासाठी 'यूपीएल' या कंपनीने अनाज बचाओ, दाना दाना किमती है हा उपक्रम सुरू केला आहे. गाजियाबाद जिल्ह्यातील सुहाना आणि रावली (ता. मुरादनगर) येथून या उपक्रमाची सुरवात करण्यात आली. या उपक्रमामध्ये शेतकऱ्यांना धान्य साठवणीच्या शास्त्रीय पद्धती प्रात्यक्षिकद्वारे दाखवण्यात आल्या.

उपक्रमाविषयी माहिती देताना 'यूपीएल' चे फ्युमिगेंट बिझनेज प्रमुख उज्ज्वलकुमार यांनी सांगितले, की प्रचंड कष्टानंतर पिकवलेले धान्य साठवणीमध्ये किडीच्या प्रादुर्भावामुळे खराब होते. हे प्रमाण ३० टक्क्यांपर्यंत आहे. यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान तर होतेच, पण अन्नसुरक्षा धोक्यात येते. शेतकऱ्यांसाठी धान्य साठवण्याच्या शास्त्रीय पद्धतीचे प्रशिक्षण घेण्यात येत आहे. या उपक्रमाची सुरवात गाजियाबाद जिल्ह्यातून झाली असली तरी उत्तर प्रदेशातील अन्य जिल्ह्यामध्येही पुढील काही महिन्यांमध्ये सुरू करण्यात येईल.

या प्रशिक्षणामध्ये यूपीएलच्या क्विकफोस या उत्पादनाच्या वापराची पद्धती व घ्यावयाची काळजी या विषयी माहिती देण्यात येते.

## मातीच्या ऱ्हासासोबत घडले प्राचीन संस्कृतींचे अस्त

महान मानल्या जाणाऱ्या अनेक प्राचीन संस्कृतींचा ऱ्हास हे कोणत्याही युद्ध किंवा आपत्तीमुळे होण्यापेक्षाही अधिक मातीची सुपीकता घटत गेल्यामुळे झाल्याचे संशोधनातून पुढे आले आहे. मातीची सुपीकता पर्यायाने पिकांचे उत्पादन घटत गेल्याने अनेक प्राचीन संस्कृतीतील बहुसंख्य लोकांना स्थलांतर करावे लागले. भविष्यामध्येही हा धोका लक्षात घेण्याची आवश्यकता जगभरातील मृदा संशोधक व्यक्त करत आहेत.

विट्स विद्यापीठातील प्रा. मेरी स्कोल्स आणि डॉ. बॉब स्कोल्स यांनी केलेल्या अभ्यासात जमिनीची सुपीकता पर्यायाने उत्पादकता वेगाने घटण्यामागे मातीची धूप, क्षारांचे वाढते प्रमाण आणि अन्नद्रव्यांची कमतरता ही तीन कारणे असल्याचे आढळले आहे. शेतीमध्ये



मातीच्या ऱ्हासासोबत संस्कृतींचाही ऱ्हास होत गेल्याचे निरीक्षण मृदासंशोधकांनी नोंदवले आहे.

सातत्याने लागवडीखाली असलेल्या जमिनीमध्ये जिवाणूंचे प्रमाण वेगाने कमी होत असून, हे जिवाणू जमिनीतील सेंद्रीय कर्बाचे रूपांतर अन्नद्रव्यामध्ये करण्यामध्ये मोलाची भूमिका बजावतात. याबाबतच संशोधन जर्नल सॉईल सायन्समध्ये प्रकाशित केले होते.

Free advt in Agrowon

All Edition Common



● Date of Publication : शुक्रवार, ५ जानेवारी २०१८, ● Posted at Market yard PSO Pune Daily. ·········· आर.एन.आय. MAHMAR/2005 रजि. नं. PCW/081/2018-20/RNI No.14922

# सक्षम नेतृत्वाअभावीच सहकार मोडकळीस

नाशिक जिल्ह्यात प्रशासकीय राजवट

**ज्ञानेश उगले**

नाशिक : नाशिक जिल्ह्यातील तीन मोठ्या सहकारी संस्थांवर प्रशासकीय राजवट लागू होण्याची नामुष्की ओढवली आहे. जिल्हा बँक, बाजार समिती या संस्थांच्या केंद्रस्थानी सर्वसामान्य शेतकरी असायला हवा. या तत्त्वाचाच विसर पडलेल्या राजकीय नेत्यांनी या संस्थांचा केवळ राजकीय आखाडा केला आहे. सहकार वृद्धिंगत करण्यापेक्षा या नेत्यांनी व्यक्तिगत स्वार्थ आणि महत्त्वाकांक्षाच मोठी केल्याने नाशिक जिल्ह्यातील सहकार मोडकळीस आला असल्याचे या क्षेत्रातील जाणकारांचे म्हणणे आहे.

नाशिक जिल्ह्यातील तीन मोठ्या सहकारी संस्थेवर प्रशासक नियुक्ती झाल्याने सहकार चळवळीचे कंबरडे मोडले आहे. त्यामुळे जिल्ह्यात या संस्थेवर प्रशासकीय राजवट असणार आहे. राज्यात सहकार चळवळ मोठ्या प्रमाणात रुजल्यानंतर त्यात होणाऱ्या गैरव्यवहारामुळे अनेक संस्था अडचणीत आल्या. यातील काही टिकल्या तर काही अवसायनात निघाल्या. प्रशासकांनी चांगले काम केले अशा संस्थांचा फायदा झाला. पण सक्षम प्रशासक न लाभलेल्या संस्थांच्या अडचणीत अधिक वाढ झाली.

नाशिक जिल्हा मध्यवर्ती बँक, मर्चंट बँक, जनलक्ष्मी बँक, नाशिक रोड-देवळाली बँक या मोठ्या संस्था आहेत. यातील नाशिक मर्चंट बँकेवर ६ जानेवारी २०१४ रोजी प्रशासकाची निवड झाली. त्यानंतर साडेतीन वर्षांत रिझर्व्ह बँकेने संचालक मंडळ का बरखास्त केले याचे उत्तर मिळाले नसल्याने माजी संचालकांनी दोन महिन्यांपूर्वी प्रशासकाविरुद्ध संताप व्यक्त केला. संचालक मंडळाच्या काळात ३० कोटी एनपीए (अनुत्पादक कर्जे) होता, आता तो १४२ कोटींवर आल्याचाही त्यांनी आरोप केला होता. पण, या बँकेची प्रशासक नियुक्तीनंतर आर्थिक स्थिती चांगली आहे. जिल्हा मध्यवर्ती बँकेची आर्थिक स्थिती खूपच बिकट आहे. कोट्यवधी रुपयांचे थकलेले कर्ज यामुळे बँक अगोदर अडचणीत आहे. त्यात गैरव्यवहाराच्या प्रकरणाने बँकेचे कंबरडे मोडले आहे. त्यामुळे प्रशासकांनासुद्धा ही बँक नफ्यात आणणे अवघड आहे.

बँकेबरोबर उत्तर महाराष्ट्रात सर्वाधिक मोठी उलाढाल असणाऱ्या नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीवर कारवाई झाली आहे. आतापर्यंत येथे एका गटाचे वर्चस्व होते. पण, गैरव्यवहाराच्या आरोपामुळे ही संस्था वादग्रस्त ठरली. त्यानंतर पाच महिन्यांपूर्वी येथेही सत्ता बदल झाला. या संस्थेवरही आता प्रशासक नियुक्त झाला आहे. जिल्ह्यातील या तीन मोठ्या संस्थांसह अनेक सहकारी संस्थेची स्थिती फारशी चांगली नाही. त्यामुळे या संस्थांवरही पुढे प्रशासकाची नियुक्ती झाली तर ही चळवळच मोडीत निघणार आहे. या तीन संस्थांबरोबरच जिल्ह्यातील गृहनिर्माण संस्था, पतसंस्था, सहकारी बँका यांची स्थिती नाजूक आहे. सरकाराचे बदलेलले धोरण, वाढता गैरव्यवहार हे यामागचे कारण आहे.

## तीन सहकारी संस्थांवर प्रशासक

नाशिक जिल्हा बँक व नाशिक कृषी उत्पन्न बाजार समिती शनिवारी (ता. ३०) बरखास्त करून प्रशासकाची नेमणूक करण्यात आली. यापूर्वी नाशिक मर्चंट बँकेवर साडेतीन वर्षांपूर्वी प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हा बँकेच्या जिल्ह्यात २१२ शाखा आहेत, तर मर्चंट बँकेच्या ४७ शाखा आहे. त्यामुळे जिल्ह्यातील दोन बँकेच्या २५९ शाखांचे काम आता प्रशासकाच्या निर्णयानुसार चालणार आहे. तसेच उत्तर महाराष्ट्रातील सर्वांत मोठी उलाढाल असणाऱ्या नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीचे कामकाजही पुढे प्रशासकाच्या निर्णयावर सुरू राहणार आहे. या तीन संस्थांसह जिल्ह्यातील इतर सहकारी संस्थांची स्थितीसुद्धा खूप चांगली नाही. त्यामुळे या संस्थेवरही ही टांगती तलवार असणार आहे.

# पटोलेंची पश्चात्ताप यात्रा रद्द; प्रवेशही लांबणीवर

**सुरेश भुसारी**


नाना पटोले

नागपूर : कोरेगाव भीमा हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर माजी खासदार नाना पटोले यांनी येत्या १२ जानेवारीपासून सुरू होणारी प्रस्तावित पश्चात्ताप यात्रा पुढे ढकलली आहे. त्याचप्रमाणे त्यांचा काँग्रेस प्रवेशही लांबणीवर पडला आहे.

राजमाता जिजाऊंचे जन्मस्थान असलेल्या सिंदखेड राजा (जि. बुलडाणा) येथून जयंतीनिमित्त येत्या १२ जानेवारीपासून विदर्भात पश्चात्ताप यात्रा पटोले काढणार होते. ही यात्रा शिवजयंतीला (१९ फेब्रुवारी) साकोली येथे पोचणार होती. ''गेल्या काही दिवसांपासून कोरेगाव- भीमाच्या हिंसाचाराच्या घटना राज्यभर घडू लागल्याने राज्यातील वातावरण योग्य नाही. याकाळात समाजामध्ये शांतता राखण्याची आवश्यकता आहे. अशा अशांत वातावरणात यात्रा काढणे योग्य होणार नसल्याने ही यात्रा पुढे ढकलण्यात येत आहे,'' असे पटोले यांनी सांगितले.

काँग्रेस अध्यक्ष राहुल गांधी यांची दिल्लीत पटोले यांनी भेट घेतल्याचे पटोले यांनी सांगितले. परंतु, आपण अद्याप काँग्रेस पक्षात प्रवेश केलेला नाही. पक्षात आपण जाणार असलो, तरी एवढ्यात प्रवेश करणार नसल्याचे पटोले यांनी स्पष्ट केले.

# मुख्यमंत्री, पवार, गडकरी यांचे मराठवाड्यातील दौरे रद्द

**औरंगाबाद** : कोरेगाव भीमा येथील घटनेनंतर गेल्या तीन दिवसांपासून राज्यात उमटत असलेले हिंसक पडसाद आणि 'बंद'च्या पार्श्वभूमीवर राजकीय नेत्यांचे मराठवाड्यातील नियोजित दौरे रद्द करण्यात आले आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, माजी कृषिमंत्री व राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार हे आज (ता. ५) विविध कार्यक्रमांना हजेरी लावण्यासाठी मराठवाड्यात येणार होते. शुक्रवारी (ता. ५) औरंगाबाद येथे ५ ते ८ जानेवारीदरम्यान भरवण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय ''महा-ॲग्रो'' कृषी प्रदर्शनाच्या उद्‍घाटनासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, शरद पवार हे एकाच व्यासपीठावर येणार होते. तर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई सहकारी साखर कारखान्याजवळील रस्त्यांच्या कामांस प्रारंभ करण्यासाठी बीड जिल्ह्यात उपस्थित राहणार होते. परंतु या तीनही प्रमुख नेत्यांचे मराठवाड्यातील नियोजित कार्यक्रम रद्द करण्यात आल्याची माहिती आहे.

बुधवारच्या 'महाराष्ट्र बंद'दरम्यान, मराठवाड्यात अनेक हिंसक घटना घडल्या. त्यामुळे आजपासून बाजरपेठा सुरू झाल्या असल्या तरी वातावरण अद्याप पूर्णपणे निवळलेले नाही.







Company Name

# In Smart Awards 2017 News Coverage in Agrowon (3 Times)

Except Nagar only Pune



## ॲग्रोवन स्मार्ट शेतकरी ॲवॉर्ड वितरण २९ डिसेंबरला

### पुण्यात विशेष सोहळ्याचे आयोजन

**पुणे (प्रतिनिधी)** : 'ॲग्रोवन स्मार्ट शेतकरी ॲवॉर्ड'चे वितरण २९ डिसेंबर रोजी पुण्यातील टिळक स्मारक मंदिर येथे आयोजित करण्यात आलेल्या विशेष कार्यक्रमात केले जाणार आहे. राज्यभरातील अकरा पुरस्कार विजेत्या शेतकऱ्यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरवण्यात येईल. पुरस्काराचे हे दुसरे वर्ष आहे.

राज्यातील शेतकरी गेल्या काही वर्षांपासून नैसर्गिक आपत्तींच्या अस्मानी आणि शेतकरीविरोधी धोरणांच्या सुलतानी संकटांचा सामना करत आहेत. याही परिस्थितीत अनेक शेतकरी कल्पकता, जिद्द आणि चिकाटीच्या बळावर आव्हानांवर मात करण्याची धडपड करत आहेत. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून यश मिळवलेल्या शेतकऱ्यांच्या कर्तृत्वाची दखल घेतली जावी आणि इतर शेतकऱ्यांना त्यांच्यापासून प्रेरणा मिळावी, या हेतूने हे पुरस्कार दिले जातात. या उपक्रमासाठी सोनाई कॅटल फिड्स, यूपीएल, जैन इरिगेशन सिस्टिम्स लि, स्मार्टकेम फर्टीलायझर्स लि. बँक ऑफ महाराष्ट्र, ओरियंटल इन्शुरन्स, चौधरी यात्रा कंपनी प्रा. लि यांचे प्रायोजकत्व लाभले आहे.

**पुरस्कार वितरण सोहळा**

- **तारीख : २९ डिसेंबर २०१७**
- **स्थळ : टिळक स्मारक मंदिर, टिळक रोड, पुणे**
- **वेळ : सायंकाळी ४ ते ७ वाजता**

राज्यस्तरीय सहा व विभागीय पाच अशा एकूण अकरा गटांमध्ये हे पुरस्कार दिले जाणार आहेत. या पुरस्कारांसाठी राज्यभरातील शेतकऱ्यांमधून मोठा प्रतिसाद मिळाला. त्रयस्थ निवड समितीने त्यातून अकरा विजेत्यांची निवड केली आहे. आजपासून टप्प्याटप्प्याने पुरस्कार विजेत्यांच्या नावांची घोषणा 'ॲग्रोवन'मधून केली जाणार आहे. या विजेत्यांच्या यशोगाथा आज (ता. २०) पासून प्रसिद्ध होत आहे. 'ॲग्रोवन महाराष्ट्राचा स्मार्ट शेतकरी' या पुरस्काराची घोषणा मात्र २९ डिसेंबरच्या मुख्य समारंभात केली जाईल. महाराष्ट्रातील कृषी व ग्रामीण संस्कृतीचे दर्शन घडविणारा खास कार्यक्रम या प्रसंगी सादर केला जाणार आहे.

राज्य पातळीवरील 'ॲग्रोवन महाराष्ट्राचा स्मार्ट शेतकरी' पुरस्कार मिळवणाऱ्या शेतकऱ्याला एक लाख रुपये, सन्मानपत्र आणि स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे. 'ॲग्रोवन प्रेरणा' आणि 'ॲग्रोवन स्मार्ट महिला शेतकरी' पुरस्काराची रक्कम प्रत्येकी २५ हजार रुपये आहे, तर विभागीय पातळीवरील 'स्मार्ट शेतकरी' पुरस्कार तसेच सेंद्रिय शेती, कृषिपूरक व्यवसाय, कृषी उद्योजक पुरस्कार प्रत्येकी १० हजार रुपयांचा आहे. या विजेत्यांनाही सन्मानपत्र आणि स्मृतिचिन्ह दिले जाणार आहे.

## सामूहिक शेततळ्यासाठी दहा कोटींचे अनुदानवाटप

### सोलापूर, उस्मानाबाद जिल्ह्यांनी घेतली आघाडी



**पुणे (प्रतिनिधी)** : राज्यातील काही कोरडवाहू जिल्ह्यांत सामूहिक शेततळ्याची संकल्पना रुजविण्यात कृषी खात्याला यश मिळते आहे. राज्यात १५ डिसेंबरपर्यंत तळे बांधलेल्या शेतकऱ्यांना ९ कोटी ५७ लाख रुपये वाटण्यात आले आहेत. त्यामुळे राष्ट्रीय फलोत्पादन अभियानामधून (एनएचएम) उस्मानाबाद आणि सोलापूर भागांत सर्वांत जास्त सामूहिक शेततळी आकाराला आली आहेत.

'एनएचएम'मधून सामूहिक शेततळ्यासाठी राज्यात ३४ जिल्ह्यांमध्ये १५ कोटी रुपये अनुदान वाटण्याचे प्रस्ताव कृषी विभागाने सादर केले होते. मात्र, योजनेला प्रतिसाद मिळत असल्याचे पाहून काही जिल्ह्यांसाठी अनुदान वाढवून देण्यात आले. त्यामुळे सुधारित आराखड्यानुसार तळ्यांसाठी यंदा २० कोटी ५७ लाख रुपये वाटण्याचा निर्णय घेण्यात आला. राज्यात १५ डिसेंबरपर्यंत तळे बांधलेल्या शेतकऱ्यांना ९ कोटी ५७ लाख रुपये वाटण्यात आले आहेत. यात सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना दोन कोटी २२ लाख रुपये, तर उस्मानाबादमध्ये दोन कोटी ६० लाख रुपये देण्यात आलेले आहेत.

कोरडवाहू जिल्ह्यांमध्ये सामूहिक शेततळ्याची संकल्पना रुजवण्यात यश मिळते आहे. त्यामुळेच औरंगाबादला आतापर्यंत ४१ लाख, जालना ९० लाख, बीड ६४ लाख, लातूर ४७ लाख तर परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना ५२ लाख रुपये अनुदान मिळाले आहे. सामूहिक शेततळे उभारण्यासाठी शेतकऱ्याला प्रथम तालुका कृषी अधिकाऱ्याकडे अर्ज करावा लागतो. सातबारा व आठ ''अ''च्या उताऱ्यासह शेतकऱ्यांना पाणी व जमीनवापराबाबत आपआपसातील सामंजस्य करार १०० रुपयांच्या स्टँपपेपरवर लिहून द्यावा लागतो, अशी माहिती सूत्रांनी दिली.

**अजून साडेदहा कोटी रुपये वाटले जाण्याची शक्यता**

**सामूहिक शेततळ्यासाठी एनएचएममधून राज्यात अजून साडेदहा कोटी रुपये अनुदानपोटी वाटले जाण्याची शक्यता आहे. जिल्हास्तरीय समितीने शेतकऱ्याचा प्रस्ताव मंजूर केल्यानंतर एक महिन्याच्या आत जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्याकडे अंतिम प्रस्ताव सादर होतात. 'जिल्हा अधीक्षकाने मंजुरी दिल्यानंतर तीन महिन्यांत शेतकऱ्याला शेततळे उभारावे लागते. तळ्याचे मातीकाम पूर्ण झाल्यानंतर ८० टक्के अनुदान मिळते व उर्वरित अनुदान तळ्यात पाणी साठल्यानंतर दिले जाते, असे कृषी विभागाचे म्हणणे आहे.**

## कृषी विभागाकडूनही 'त्या' कंपनीच्या बीटी बियाणे नमुन्याची तपासणी

**अकोला (प्रतिनिधी)** : नांदुरा तालुक्यात असलेल्या महाराष्ट्र हायब्रीड सीड कंपनी (महिको)च्या गोदामांवर शुक्रवारी (ता. ८) पोलिसांनी सील करण्याची कारवाई केली. या कारवाईत सुरवातीला कृषी विभागाला बाजूला ठेवण्यात आले होते. पोलिसांची तपासणी झाल्यानंतर आता कृषी विभागानेही बीटी बियाण्याचे नमुने तपासणीसाठी पाठविले आहेत.

जालना जिल्ह्यात झालेल्या तक्रारीनंतर पोलिस विभागाने आठ डिसेंबरला बुलडाणा जिल्ह्यात नांदुरा तालुक्यातील धानोरा या ठिकाणी असलेल्या कंपनीच्या गोदामांना सील केले होते. पोलिसांनी तपासणी केल्यानंतर कृषी विभागाची यंत्रणा तातडीने तेथे पोचली होती. लगेच दुसऱ्या दिवशी कृषी विभागानेही तेव्हा बीटी कपाशीचे नमुने तपासणीसाठी घेऊन गोदाम सील केले होते.

ही संपूर्ण कारवाई गोपनीय पद्धतीने होत आहे. अद्याप पोलिस तसेच कृषी विभागाकडून कुठलीही माहिती 'लीक' झालेली नाही. विशेष म्हणजे या ठिकाणी पोलिस कारवाईच्या दुसऱ्या दिवशी शनिवारी (ता. ९) दिवसभर विभागीय सहसंचालक सुभाष नागरे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी प्रमोद लहाळे व इतर वरिष्ठ, तालुकास्तरीय अधिकाऱ्यांची चमू तळ ठोकून होती. त्यानंतर पुन्हा गुरुवार (ता. १४)पासून नमुने घेण्याचे काम सुरू असल्याचे एका अधिकाऱ्याने स्पष्ट केले. लवकरच ही कारवाई पूर्ण होईल, असेही सांगण्यात आले.

वरिष्ठांच्या निर्देशाप्रमाणे कंपनीमधील बियाण्यांचे नमुने घेतले जात असून, फौजदारी कारवाईच्या अनुषंगाने कागदपत्रांची जुळवाजुळव केली जात असल्याचे जिल्हा परिषद वर्तुळातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

सकाळ ॲग्रोवन — आयोजित
MAHAVIR STEEL INDUSTRIES LTD ...दुसरे तिसरे काही नको — प्रायोजित
सकाळ ॲग्रोवन संवाद
'ॲग्रोवन' साधणार शेतकऱ्यांशी संवाद
कार्यक्रम वेळापत्रक
गुरूवार, २१ डिसेंबर २०१७
विषय - निर्यातक्षम द्राक्ष उत्पादन
वक्ते- श्री. मंगेश भास्कर
(द्राक्षतज्ज्ञ)
स्थळ - राजा शिवछत्रपती सभागृह, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मु.पो. गुंजाळवाडी, ता. जुन्नर जि. पुणे, वेळ - सायं. ५.३० वाजता
या मार्गदर्शन मेळाव्याचा आपण व आपल्या शेतकरी मित्रांनी अवश्य लाभ घ्यावा, ही विनंती.



Company Name

# in Smart Awards 2017 News Coverage in Agrowon (3 Times)



# गोंदिया, परभणी गारठले

**पुणे (प्रतिनिधी)** : कोकण, मध्य महाराष्ट्र व विदर्भाच्या काही भागांत किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत लक्षणीय घट झाली. विदर्भातील गोंदिया व मराठवाड्यातील परभणी येथील कृषी विद्यापीठाच्या आवारात ७.२ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली असल्याचे हवामान विभागाच्या सूत्रांनी सांगितले.

सध्या राज्यात कोरडे हवामान आहे. त्यामुळे थंडीत वाढ होत आहे. येत्या आठवडाभर ही थंडी कायम राहील. त्यानंतर काही अंशी चढउतार सुरू होतील, असा अंदाज हवामान विभागाच्या सूत्रांनी व्यक्त केला. गेल्या चार ते पाच दिवसांपासून थंडीच्या लाटेमुळे किमान तापमानाचा पारा पाच अंशांपर्यंत खाली घसरला होता.

कोकणातील मुंबई, रत्नागिरी, डहाणू, भिरा येथील किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत दोन ते तीनपर्यंत घट झाली आहे. मध्य महाराष्ट्रात पुणे, जळगाव, कोल्हापूर, नाशिक, सातारा, सोलापूर येथील किमान तापमानात दोन ते तीन अंशांपर्यंत घट झाली. नाशिक, जळगाव येथे सर्वात कमी ८.८ अंश सेल्सिअसची नोंद झाली. पुण्यातील किमान तापमानाचा पारा सरासरी एवढा असून ९.४ अंश सेल्सिअस किमान तापमान नोंदविले गेले.

मराठवाड्यातील परभणी येथील किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत चार अंश सेल्सिअसने घटले असून ९.५ अंश सेल्सिअसची सर्वात कमी किमान तापमान नोंदविले गेले. औरंगाबाद येथील किमान तापमानात नऊ अंशांपर्यंत होते. विदर्भातील किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत पाच अंशांपर्यंत घटले. नागपूर, गोंदिया येथील किमान तापमान दहा अंशाच्या खाली आले. अमरावती, बुलडाणा, चंद्रपूर, वाशीम, वर्धा यवतमाळ येथील किमान तापमान दहा अंशांच्या वर होते.

# नाशिक बाजार समिती आणि जिल्हा बँक बरखास्त

▸ पान १ वरून

यासंदर्भात तेथील पक्षाचे मुखपत्र असलेल्या मनोगतचे समन्वयक यांनी विशेष पत्र देऊन जिल्हा उपनिबंधकांकडे पाठपुरावाही केला होता. बाजार समितीच्या तत्कालीन सभापतींनी गैरव्यवहार करून शिखर बँकेचे कर्ज थकवल्याचा प्रकार उघडकीस आला होता. त्याचबरोबर बाजार समितीच्या पेठरोड येथील आवारात अनधिकृतरीत्या पत्र्याचे गाळे उभारून व्यापाऱ्यांना लाखो रुपयांना विकत दिले. त्याचे खरेदीखत करून दिले नसल्याचा प्रकार उघडकीस आला होता. तसेच कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीचे पैसे परस्पर लाटले जात असल्याचे आढळून आल्याने समिती सभापती देविदास पिंगळे यांच्यावर पोलिस कारवाई झाली होती. समितीच्या संचालक मंडळाने पिंगळेंवर अविश्वास ठराव आणून त्यांना सभापतिपदावरून पायउतार केले होते.

दरम्यान सहा महिन्यांपूर्वीच नाशिक बाजार समितीचा पदभार नव्याने निवड झालेले शिवाजी चुंभळे यांनी सभापतीच्या रूपाने घेतला होता. त्यात त्यांनी प्रामुख्याने बाजार समितीच्या कारभाराचा आढावा घेऊन कामकाजाला सुरवात केली होती. पण बाजार समिती बरखास्ती प्रकरणाचीही सुनावणी एका बाजूला सुरू होती. विशेष म्हणजे नवीन सभापतींच्या निवडीनंतर महिनाभरातच या प्रकरणाची सुनावणी जिल्हा उपनिबंधकांनी पूर्ण करून पणन खात्याकडे पुढील कारवाईसाठी अहवाल पाठविला होता. विशेष योगायोग म्हणजे आजच्याच दिवशी जिल्हा बँकेसोबतच बाजार समितीचे संचालक मंडळ बरखास्त झाल्याने सहकार वर्तुळात चर्चेचा विषय ठरला आहे

**बेकायदा नोकर भरती भोवली**

नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी दोन दिवसांपूर्वीच भाजपचे केदा आहेर यांची निवड झाली असतानाच, नोकर भरती प्रकरणात सहकार विभागाने जिल्हा बँकेवर बरखास्तीची कारवाई केल्याने खळबळ उडाली आहे. सहकार कलम ११० प्रमाणे विभागीय सहनिबंधक मिलिंद भालेराव यांनी ही कारवाई केली. शनिवारी बँकेची सूत्रे प्रशासकांनी सांभाळली आहेत. या कारवाईमुळे भाजपला मोठा झटका बसला आहे. बेकायदा नोकर भरती आणि बँकेच्या पैशाने स्वतःचे पद वाचविण्यासाठी केलेला खटाटोप संचालक मंडळाच्या अंगलट आला असून आरबीआयच्या आदेशाने ही कारवाई करण्यात आली आहे. जिल्हा बँकेचा कारभार नेहमीच वादात राहीला आहे. संचालकांच्या लहरी कारभारामुळे अखेर शनिवारी विभागीय सहनिबंधक मिलिंद भालेराव यांनी जिल्हा बँकेवर बरखास्तीची कारवाई केली. बँकेवर प्रशासक म्हणून भालेराव यांनी पदभार स्वीकारला आहे. बेकायदा नोकरभरती आणि अपात्रतेची कारवाई टाळण्यासाठी झालेल्या खर्चापोटी सहकार विभागाने विद्यमान संचालकांवर आठ कोटी ३६ लाखांची वसुली काढत त्यांना नोटिसा बजावल्या होत्या. त्यात विद्यमान अध्यक्ष केदा आहेर यांच्यासह माजी अध्यक्ष नरेंद्र दराडेसह १९ संचालकांचा समावेश होता. त्यांना २२ जानेवारीपर्यंत मुदत देण्यात आली होती. परंतु त्यापूर्वीच आरबीआयच्या आदेशानुसार कलम ११० अन्वये बरखास्तीची कारवाई करण्यात आली आहे. दोन दिवसांपूर्वीच बँकेवर प्रथमच भाजपचे केदा आहेर अध्यक्ष म्हणून निवडून आले होते. त्यामुळे सहकार क्षेत्रात भाजपचा प्रवेश हा कमनशिबी ठरला आहे. या संचालकांनी रक्कम भरली नाही तर थेट त्यांच्यावर गुन्हे दाखल केले जाण्याची शक्यता आहे.

# कार्यक्षम पाणी वापरासाठी धोरण हवे

▸ पान १ वरून

यावेळी डॉ. व्यंकटेश्वरलू म्हणाले, की शेतीमध्ये सिंचनासाठी वापरात येणाऱ्या पाण्याची उत्पादकता कमी असल्यामुळे अनेक देशांत जास्त पाण्याची गरज असलेल्या पिकांचे उत्पादन घेतले जात नाही. त्यांची आयात केली जाते. तापमानात एक अंशाने वाढ झाली तर पाण्याची गरज दहा टक्क्यांनी वाढते. योग्य व्यवस्थापन न केल्यास शेतीसाठी पाणी कमी पडू शकते. त्यामुळे येत्या काळात सर्वांनाच जागरूक होऊन समजदारीने पाणी वापर करावा लागणार आहे.

डॉ. भाले म्हणाले, की पाऊस कमी झालेला नाही. पावसाच्या आगमनाच्या वेळेत बदल झाला आहे. त्यामुळे पडणाऱ्या पाण्याचे संवर्धन केल्यास मराठावाडा, विदर्भातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी एक संरक्षित पाणी उपलब्ध होऊ शकते. सिंचन क्षेत्रात वाढ करण्यासाठी कालव्या ऐवजी बंदिस्त सिंचन प्रणालीचा अंगीकार करावा लागणार आहे. शेतकऱ्यांच्या गरजेनुसार आवश्यक संशोधनावर कृषी विद्यापीठांना भर द्यावा लागणार आहे.

डॉ. मोरे म्हणाले, की निसर्ग कोपलेला, अवर्षण प्रवण भाग असलेल्या मराठवाड्यातील शेतकऱ्यांना अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत केवळ आठ महिने सिंचनासाठी पाणी उपलब्ध होते. यावेळी प्रा. बापू अडकिने, प्रा. हरिश्चंद्र शिंदे यांनी संपादित केलेल्या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. कवी प्रा. इंद्रजित भालेराव यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. संध्याताई दूधगावकर यांनी आभार मानले.

**विशेष कामगिरीबद्दल गौरव**

'अॅग्रोवन'चे सहसंपादक विजय सुकळकर, स्वच्छतादूत माधवराव पाटील शेळगावकर, स्वातंत्र्य सैनिक वसंतराव अंभुरे, पत्रकार उत्तमराव दगडू, मृदाशास्त्रज्ञ डॉ. एस. बी. वराडे, प्रशांत आडे, कमलकांत वडेलकर यांचा सन्मानपत्र देऊन विशेष सत्कार करण्यात आला. सिंचन मित्र पुरस्कार- चंद्रकांत कुलकर्णी (रा. डोंगरकडा, जि. हिंगोली). प्रयोगशील शेतकरी पुरस्कार, रामेश्वर मांडगे (रा. बेलवाडी, जि. हिंगोली). विद्याताई पवार- उत्कृष्ट महिला शेतकरी पुरस्कार, द्रौपदी जाधव (जिंतूर), ताराबाई केशवराव वसेकर (रा. खानापूर, जि. परभणी). ल. स. कोकीळ सिंचन पुरस्कार, रुस्तुमराव देशमुख (रा. इरळद, जि. परभणी). विमलताई बेलसरे सिंचन पुरस्कार, प्रताप काळे (धानोरा काळे, जि. परभणी), राजेंद्र गाडेकर (पेण टाकळी). ल. स. कोकीळ सिंचन लेखन पुरस्कार डॉ. नितिन मार्कंडेय, प्रा. मधुकर मोरे, डॉ. स्मिता खोडके. उद्योजकता पुरस्कार मुरलीधर डाके, पुरुषोत्तम खुराणा, श्री. पेडगावकर, मो. युसूफ इनामदार. ब्रह्मदेव सरडे, सुभाष अडकिने, प्रवीण पाटील, जनार्दन शिंदे, बाळासाहेब शिंदे, संजय मोरे यांचा सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.

# संजीव माने महाराष्ट्राचे स्मार्ट शेतकरी

▸ पान १ वरून

सकाळ माध्यम समूहाचे अध्यक्ष प्रतापराव पवार, संचालक भाऊसाहेब पाटील, मुख्य संपादक श्रीराम पवार, सकाळचे चीफ ऑपरेटिंग ऑफिसर महेंद्र पिसाळ, 'अॅग्रोवन'चे संपादक आदिनाथ चव्हाण, सरव्यवस्थापक प्रमोद राजेभोसले, जैन इरिगेशनचे सिस्टिम लिमिटेडचे सहव्यवस्थापकीय संचालक अतुल जैन, बँक ऑफ महाराष्ट्रचे सरव्यवस्थापक रमेश क्षीरसागर, सोनाई कॅटल फीडचे अध्यक्ष किशोर माने, स्मार्टकेम टेक्नोलॉजीचे उपाध्यक्ष नरेंद्र देशमुख, सहयोगी उपाध्यक्ष विजयराव पाटील, ओरिएन्टल इन्शुरन्सच्या क्षेत्रिय प्रबंधक विनिता जोशी, चौधरी यात्रा कंपनीचे संचालक ब्रिजमोहन चौधरी, यूपीएलचे टेक्नोलॉजी हेड डॉ. माधव नाटेकर आदींच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला. 'अॅग्रोवन'चे नवे ऍप आणि वेबसाईटचेदेखील या वेळी अनावरण करण्यात आले.

राज्यातील अकरा प्रयोगशील शेतकऱ्यांना या वेळी 'अॅग्रोवन स्मार्ट अॅवॉर्ड'ने गौरविण्यात आले. या सोहळ्याला सोनाई कॅटल फीड्स, यूपीएल, जैन इरिगेशन सिस्टिम्स लि., स्मार्टकेम फर्टिलायझर्स लि. बँक ऑफ महाराष्ट्र, ओरिएन्टल इन्शुरन्स, चौधरी यात्रा कंपनी प्रा.लि. यांचे प्रायोजकत्व लाभले.

'अॅग्रोवन' स्मार्ट शेतकरी पुरस्कारांविषयी अवघ्या महाराष्ट्राच्या कृषी क्षेत्रात उत्सुकता लागून असते. या पुरस्कारासाठी निवड समितीमार्फत राज्य पातळीवरील पाच आणि विभागीय पातळीवरील पाच स्मार्ट शेतकरी निवडण्यात आले. परीक्षक म्हणून माजी कुलगुरू डॉ. व्यंकट मायंदे, कृषी तज्ज्ञ डॉ. सौ. तरन्नुम कादरभाई आणि सेंद्रिय गटशेतीचे प्रसारक अंकुश पडवळे यांनी काम पाहिले. सांगली जिल्ह्यातील कृषिभूषण शेतकरी श्री. माने यांना एक लाख रुपये, सन्मानपत्र आणि स्मृतिचिन्ह असे स्वरूप असलेला 'अॅग्रोवन महाराष्ट्राचा स्मार्ट शेतकरी' हा सर्वांत मानाचा पुरस्कार घोषित होताच सभागृहात टाळ्यांचा प्रचंड गजर झाला.

राज्याचे सहकारमंत्री सुभाष देशमुख यांनी पुरस्कारप्राप्त शेतकऱ्यांचे तोंड भरून कौतुक केले. निराशा आणि समस्यांच्या वातावरणातही कर्तृत्ववान शेतकऱ्यांना जगासमोर आणणारा 'अॅग्रोवन'चा उपक्रम स्तुत्य असल्याचे श्री. देशमुख म्हणाले. "शेतकरी हाच आपला पोशिंदा आहे. कर्जमाफी किंवा शेतमाल भाव वाढून मिळत असल्यास शहरवासीयांनी आमच्या समस्याग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठिशी उभे राहावे, मी तुम्हाला हात जोडून विनंती करतो, असे भावनिक आवाहन श्री. देशमुख यांनी करताच सभागृह गलबलून गेले.

'अॅग्रोवन महाराष्ट्राचा स्मार्ट शेतकरी' पुरस्कार स्वीकारताना सभागृहातून होत असलेला टाळ्यांचा गजर आणि कौतुकाचा वर्षाव पाहून श्री. माने यांचे डोळे भरून आले. 'प्रयोगशील शेतकरी म्हणून अनेक पुरस्कार मी स्वीकारले, पण आज माझ्या आनंदाला पारावार राहिलेला नाही. आनंद गगनात मावेनासा होणे म्हणजे काय असते ते मी आज अनुभवतो आहे. मी 'अॅग्रोवन'च्या कायम ऋणात राहीन, असे भावपूर्ण उद्गार श्री. माने यांनी काढले.

विदर्भातील आत्महत्याग्रस्त कुटुंबातील महिला शेतकरी ज्योती देशमुख यांना 'अॅग्रोवन प्रेरणा' पुरस्काराचे वितरण होताना सभागृह काही क्षण निःशब्द झाले होते. आत्महत्याग्रस्त कुटुंबाला सावरण्यासाठी जिद्दीने शेती करीत असलेल्या ज्योतीताईंची यशोगाथा ऐकल्यानंतर त्यांच्या कर्तृत्वाला सलाम करण्यासाठी अवघ्या सभागृहाने उभे राहून टाळ्यांचा प्रचंड कडकडाट करत मानवंदना दिली.

**स्मार्ट शेतकरी पुरस्काराचे मानकरी असे :**

अॅग्रोवन महाराष्ट्राचा स्मार्ट शेतकरी - संजीव माने (मु. पो. आष्टा, ता. वाळवा, जि. सांगली), अॅग्रोवन स्मार्ट महिला शेतकरी - विद्या रुद्राक्ष (डिघोळअंबा, अंबाजोगाई, बीड), अॅग्रोवन स्मार्ट सेंद्रिय शेती - प्रभाकर चौधरी (सुभाषनगर, धुळे), अॅग्रोवन स्मार्ट कृषी उद्योजक - विकास दांगट (पुणे), अॅग्रोवन प्रेरणा पुरस्कार - ज्योती देशमुख (कटयार, अकोला), अॅग्रोवन स्मार्ट कृषिपूरक व्यवसाय - पृथ्वीराज चव्हाण (विठ्ठलवाडी, वाई, सातारा), अॅग्रोवन पश्चिम महाराष्ट्राचा स्मार्ट शेतकरी - तानाजी हाके (खर्डी, पंढरपूर, सोलापूर), अॅग्रोवन उत्तर महाराष्ट्राचा स्मार्ट शेतकरी - नाना पाटील (पिंप्रीखुर्द, चाळीसगाव, जळगाव), अॅग्रोवन कोकणचा स्मार्ट शेतकरी - रामचंद्र सावे (चिंचणी, डहाणू, पालघर), अॅग्रोवन मराठवाड्याचा स्मार्ट शेतकरी - रवींद्र देवरवाडे (देवळा, अंबाजोगाई, बीड), अॅग्रोवन विदर्भाचा स्मार्ट शेतकरी - मोहन जगताप (वळती, चिखली, बुलडाणा). यातील 'अॅग्रोवन प्रेरणा' तसेच 'अॅग्रोवन स्मार्ट महिला शेतकरी' पुरस्काराचे स्वरूप प्रत्येकी 25 हजार रुपये, सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह असे आहे. इतर सर्व पुरस्कारांचे स्वरूप प्रत्येकी दहा हजार रुपये, सन्मानपत्र आणि स्मृतिचिन्ह असे होते.

# Company Name
# in Smart Awards 2017 News Coverage in Agrowon (3 Times)



## तेलंगणातून १७ शेतमजुरांची सुटका

**अकोला (प्रतिनिधी) :** कामाच्या शोधात तेलंगणामध्ये पोचलेल्या १७ शेतमजुरांना आठ दिवस हालअपेष्टा सहन केल्यानंतर पोलिसांच्या कामगिरीमुळे सुखररूप गावी परत येता आले. जिल्ह्यातील मूर्तिजापूर तालुक्यातील कुरुम व परिसरातील १७ मजुरांची पोलिसांनी सुटका करीत परत आणले. या शेतमजुरांना तेलंगणा राज्यातील मामाढगी गावातून सोडण्यात आले. जिल्ह्यातील माना पोलिसांनी मंगळवारी (ता. २६) तेलंगणा राज्यातून सुटका केली.

गावाकडे कामे नसल्याने मूर्तिजापूर तालुक्यातील करुम व पापड या गावातील काही जण रोजंदारी मिळणार म्हणून यवतमाळच्या मधुकर चव्हाण नावाच्या व्यक्तीच्या माध्यमातून तेलंगणात गेले होते. यात एका महिलाही होती. मधुकर चव्हाण याने या शेतमजुरांना तेलंगणातील मामाढगी (जि. संघरेड्डी) गावातील येला रेड्डी नामक व्यक्तीच्या शेतात मजुरीसाठी ठेवले.

उसाच्या शेतात दिवसभर राबल्यावर त्यांना मजुरी देण्याएवजी एका खोलीत डांबून मारहाण करण्यात आली.



अकोला : पोलिसांनी सुटका केलेले शेतमजूर.

> **चव्हाण नामक एका व्यक्तीने ५०० रुपये मजुरी देतो असे सांगून तेलंगणात नेले होते. तेथे उसाच्या शेतात दिवसभर मजुरी केल्यावर केवळ एक वेळ जेवण मिळायचे. मजुरीचे पैसे तर दिलेच नाहीत. शिवाय एका खोलीत डांबून मारहाण केली जात असे.**
>
> **– सुधाकर सुखदेव इंगोले,** शेतमजूर

दिवसभर काम अन् एकवेळचं जेवण, शिवाय मारहाण हा प्रकार रोजच सुरू होता. त्यातच भाषेचीही अडचण होती. यापैकी एका शेतमजुराने संधी साधून गावातील नातेवाइकाशी मोबाईलवरून संपर्क साधला. शेतमजुरांची आपबिती एकल्यावर थक्क झालेल्या नातेवाइकांनी थेट माना पोलिस ठाणे गाठले. पोलिसांनी सायबर विभागाच्या मदतीने बंदिस्त शेतमजुरांचा ठावठिकाणा लावला.

## बोंड अळी सर्व्हेसाठी पैसे मागणारा तलाठी निलंबित

**अकोला (प्रतिनिधी):** तलाठी मुख्यालयी गैरहजर राहतो, तसेच बोंडअळीच्या सर्व्हेक्षणासाठी पैशांची मागणी केल्याबाबतची तक्रार जिल्हाधिकाऱ्यांकडे दाखल झाल्यानंतर मंगळवारी (ता.२६) संबंधिताला तत्काळ निलंबित करण्यात आले. बाळापूर तालुक्यातील खिरपुरी येथे कार्यरत असलेले तलाठी एम. यू. भगत यांना जिल्हाधिकारी अस्तिककुमार पाण्डेय यांच्या आदेशानुसार निलंबित करण्यात आले.

याबाबत अधिक असे, की बाळापूर तालुक्यातील खिरपुरी येथे तलाठी म्हणून एम. यू. भगत कार्यरत आहेत; परंतु ते मुख्यालयी हजर राहत नाहीत, बोंडअळीच्या सर्व्हेक्षणासाठी पैशांची मागणी करतात, नागरिकांना उद्धटपणाची वागणूक देतात यासह अनेक आरोप करणारी तक्रार खिरपुरी येथील नागरिकांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली होती. त्याबरोबरच खिरपुरी खुर्द ग्रामपंचायतीने ठरावदेखील घेतला होता.

या तक्रारींचे गांभीर्य पाहता कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी जिल्हाधिकारी पाण्डेय यांनी भगत यांना निलंबित करण्याचे आदेश दिले.

## थंडीच्या लाटेने विदर्भ गारठला

▸ पान १ वरून

कोकणातील किमान तापमानात चढउतार सुरू आहे. राज्याच्या उर्वरित भागांत किमान तापमान सरासरीच्या जवळपास होते. पुणे परिसरात येत्या रविवारपर्यंत (ता. ३१) पुणे परिसरात आकाश मुख्यत निरभ्र राहील. सध्या राज्यात हवामान कोरडे आहे. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून थंडी हळूहळू वाढू लागली आहे. विदर्भातील नागपूर येथील किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत पाच अंशांनी घटले. गोंदिया, वर्धा येथील किमान तापमानही सरासरीच्या तुलनेत चार अंशांनी घटले. उर्वरित भागातही किमान तापमानात एक ते तीन अंशांनी घटले असून विदर्भात थंडीने चांगलीच हुडहुडी भरविली आहे. कोकणातील मुंबई, डहाणू, भिरा येथील किमान तापमान सरासरीच्या तुलनेत एक अंशाने घटले आहे. अलिबाग, रत्नागिरी येथील किमान तापमान सरासरीच्या तुलनेत एक अंशाने वाढले आहे. मध्य महाराष्ट्रातील नाशिक, महाबळेश्वर, नगर, सातारा येथील किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत एक अंशाने घटले. पुणे, कोल्हापूर, मालेगाव, सांगली येथील किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत एक अंशाने वाढले. मराठवाड्यातील औरंगाबाद, परभणी, नांदेड येथील किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत एक ते चार अंशांनी घटले असल्याचे हवामान विभागाच्या सूत्रांनी सांगितले.

**बुधवारी (ता. २७) सकाळी आठ वाजेपर्यंतचे किमान तापमान व कंसात झालेली घट (अंश सेल्सिअसमध्ये) :** मुंबई (सांताक्रूझ) १६.६ (-१), अलिबाग १८.४(१), रत्नागिरी २०.३ (१), डहाणू १६.८ (-१), भिरा १५.० (-२), पुणे १०.८, जळगाव ९.० (-२), कोल्हापूर १६.१ (१), महाबळेश्वर १२.० (-१), मालेगाव १०.५, नाशिक ८.२ (-१), सांगली १४.१ (१), सातारा १२.३ (-१), सोलापूर १५.०, औरंगाबाद १०.१ (-१), ,परभणी ९.५ (-४), नांदेड १०.० (-२), उस्मानाबाद ८.६, अकोला ९.४ (-४), अमरावती ११.२(-३), बुलडाणा १२.०(-२), चंद्रपूर १०.८ (-३), गोंदिया ८.१ (-४), नागपूर ७.८ (-५), वर्धा ९.१ (-४), यवतमाळ १२.० (-२).

## कापूस संशोधन संस्थेचे एचटी बियाण्याकडे दुर्लक्ष

▸ पान १ वरून

त्यानंतरही एकट्या यवतमाळ जिल्ह्यात सुमारे २५ लाख पाकीट हर्बीसाईड टॉलरंट बियाण्यांची विकल्या गेली, असे निरीक्षण केंद्रीय कापूस संशोधन संस्थेने नोंदविले आहे.

**एवढ्या मोठ्या प्रमाणावर बियाणे पोचले कसे?**

इतक्या मोठ्या प्रमाणात हे बियाणे मान्यतेशिवाय कसे विकल्या गेले आणि बीजोत्पादन कोठे झाले; याविषयी सारेच एकमेकांकडे बोट दाखवित आहेत. तंत्रज्ञान पुरवठादार मोन्सॅटोने एच. टी. तंत्रज्ञानाचे बियाणे संशोधन संस्थांच्या प्रक्षेत्रावरून बाहेर गेल्याची साशंकता व्यक्त केली होती. परंतु, यातून संशोधक संस्थांना कोणताच फायदा नसल्याने हा दावा खोटा असल्याचे या क्षेत्रातील जाणकार सांगतात. त्यामुळे यवतमाळ जिल्ह्यात इतक्या मोठ्या प्रमाणावर बियाणे कसे पोचले याचा शोध घेण्याचे आव्हान यंत्रणांसमोर आहे.

**फेब्रुवारीतच आढळले पहिले प्रकरण**

एच. टी. बियाणे तपासणीसाठी देशात अवघ्या तीन प्रयोगशाळा आहेत. त्यामध्ये नागपुरातील केंद्रीय कापूस संशोधन संस्थेतील एक त्यासोबतच दिल्ली आणि आंध प्रदेशमधील प्रत्येकी एका प्रयोगशाळेचा समावेश आहे. दरम्यान अशाच एका प्रकरणात कृषी विभागाचे प्रतिनिधी केंद्रीय कापूस संशोधन गेले होते. त्या वेळी एच.टी. पॉझिटीव्ह वाणाचा अहवाल त्यांना त्या ठिकाणी मिळाला. फेब्रुवारीतच हे प्रकरण समोर आले होते. परंतु, सीआयसीआरच्या तत्कालीन संचालकांनी शेतकऱ्याने हा नमुना आणल्यामुळे ही बाब गंभीरतेने घेतली नव्हती, असे सांगत आपली जबाबदारी झटकली. या संदर्भाने वेळीच यंत्रणांना सावध केले असते तर यवतमाळ जिल्ह्यात इतक्या मोठ्या प्रमाणात एच. टी. बियाण्यांची लागवड झाली नसती, असे कृषी विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगीतले. तत्कालीन संचालकांशी याविषयी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र ते उपलब्ध होऊ शकले नाही.

## अॅग्रोवन अॅवॉर्डसचे पुण्यात उद्या वितरण

▸ पान १ वरून

प्रतिकूल परिस्थितीवर मात करून यश मिळवलेल्या शेतकऱ्यांच्या कर्तृत्वाची दखल घेतली जावी आणि इतर शेतकऱ्यांना त्यांच्यापासून प्रेरणा मिळावी, या हेतूने हे पुरस्कार दिले जातात. या उपक्रमासाठी सोनाई कॅटल फिड्स, यूपीएल, जैन इरिगेशन सिस्टिम्स लि, स्मार्टकेम फर्टिलायझर्स लि., बँक ऑफ महाराष्ट्र, ओरिएंटल इन्शुरन्स, चौधरी यात्रा कंपनी प्रा. लि यांचे प्रायोजकत्व लाभले आहे.

राज्यस्तरीय सहा व विभागीय पाच अशा एकूण अकरा गटांमध्ये हे पुरस्कार दिले जातील. पुरस्कारांसाठी राज्यभरातील शेतकऱ्यांमधून मोठा प्रतिसाद मिळाला. त्रयस्थ निवड समितीने त्यातून अकरा विजेत्यांची निवड केली आहे. यापैकी १० पुरस्कार विजेत्यांच्या नावांची घोषणा तसेच त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा परिचय 'अॅग्रोवन'मधून आजअखेर करून दिला आहे. अॅग्रोवन महाराष्ट्राचा स्मार्ट शेतकरी या मुख्य पुरस्काराची घोषणा मात्र २९ डिसेंबरच्या मुख्य सोहळ्यात केली जाईल. कृषी आणि ग्रामीण संस्कृतीचे दर्शन घडविणारा मनोरंजनाचा विशेष कार्यक्रम या प्रसंगी सादर होणार आहे.

'अॅग्रोवन महाराष्ट्राचा स्मार्ट शेतकरी' पुरस्कार मिळवणाऱ्या शेतकऱ्याला एक लाख रुपये देऊन गौरविण्यात येणार आहे. 'अॅग्रोवन प्रेरणा' आणि 'अॅग्रोवन स्मार्ट महिला शेतकरी' पुरस्काराची रक्कम प्रत्येकी २५ हजार रुपये आहे, तर विभागीय पातळीवरील 'स्मार्ट शेतकरी' पुरस्कार तसेच सेंद्रिय शेती, कृषिपूरक व्यवसाय, कृषी उद्योजक पुरस्कार प्रत्येकी १० हजार रुपयांचा आहे. सर्व पुरस्कारार्थींना सन्मानपत्र आणि स्मृतिचिन्हही दिले जाणार आहे.

## वीज कंपनीविरुद्ध जनक्षोभ

▸ पान १ वरून

यामुळे केळवद कार्यालयाअंतर्गत असलेल्या केळवद, शिरपूर, किन्होळा, वाडी ब्रह्मपुरी, गिरोला, हातणी या गावांतील शेतकऱ्यांचा वीजपुरवठा पाच दिवसांपासून ठप्प झाला होता. या गावांमधील गहू, हरभरा, मका, कांदा व भाजीपाल्याची पिके धोक्यात आली होती. महावितरणने अचानकपणे सरसकट कृषिपंपांचा वीजपुरवठा खंडित केल्याने पेच बनला होता. त्यामुळे शेतकऱ्यांनी बोंद्रे यांच्यासह केळवद येथील कार्यालय गाठले; परंतु तेथे कोणताही अधिकारी, कर्मचारी नव्हता. थोड्या वेळाने बुलडाणा येथून कार्यकारी अभियंता श्री. रामटेके तेथे पोचले. त्यांच्याकडूनही शेतकऱ्यांना दिलासा न मिळाल्याने शेतकऱ्यांनी संतापाच्या भरात केळवद येथील कार्यालयास आग लावली. शेतकऱ्यांचा वीजपुरवठा सुरळीत होत नाही तोपयपर्यंत अधिकारी कर्मचाऱ्याला येथून हलू देणार नसल्याचा आक्रमक पवित्रा घेण्यात आल्याने खंडित वीजपुरवठा सुरळीत करण्यात आला.

**नांदुऱ्यात काँग्रेस-राष्ट्रवादीचे आंदोलन**

वीजप्रश्नावर नांदुरा येथे काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी आंदोलन केले. काँग्रेस नेत्यांनी वीज कार्यालयास तालाठोको आंदोलन केले; तर राष्ट्रवादीच्या नेत्यांनी हल्लाबोल आंदोलन होते.

# Company Name
# in Smart Awards 2017 News Coverage in Agrowon (3 Times)

सकाळ
www.agrowon.com
अॅग्रोवन
मित्र ग्लोबल शिवाराचा..

अॅग्रोवन महाराष्ट्राचा स्मार्ट शेतकरी अॅवॉर्ड : **संजीव गणपतराव माने,** आष्टा, जि. सांगली




**टार्गेट एकरी १५१ टनांचे...**



**नदी वाहते...**

पान १२ वर ▸

पुणे रविवार, ३१ डिसेंबर २०१७ । पाने १६ । किंमत ₹ ३ । www.epaper.agrowon.com पुणे, कोल्हापूर, नाशिक, मुंबई, औरंगाबाद, सोलापूर, नागपूर, जळगाव, नांदेड, अकोला येथून प्रसिद्ध

# संजीव माने महाराष्ट्राचे स्मार्ट शेतकरी

## अॅग्रोवन स्मार्ट अॅवॉर्डस्‌चे दिमाखदार सोहळ्यात वितरण | जिद्दी शेतकऱ्यांच्या यशोगाथांना सन्मानपूर्वक सलाम

**पुणे (प्रतिनिधी) : सकाळ माध्यम समूहाकडून दिला जाणारा मानाचा 'अॅग्रोवन महाराष्ट्राचा स्मार्ट शेतकरी पुरस्कार' यंदा सांगली जिल्ह्यातील आष्टा गावचे संशोधक शेतकरी संजीव माने यांना दिमाखदार सोहळ्यात प्रदान करण्यात आला. राज्याच्या ऊस शेतीत शास्त्रज्ञांच्या तोडीचे क्रांतिकारक प्रयोग करणाऱ्या संजीव माने यांनी हजारो सामान्य शेतकऱ्यांपर्यंत ऊस उत्पादकता वाढीचे तंत्र पोचविले आहे. पुण्याच्या टिळक स्मारक सभागृहात त्यांना टाळ्यांच्या गजरात सहकारमंत्री सुभाष देशमुख यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला. लोकप्रिय गीते आणि नृत्याच्या रंगतदार मनोरंजन सोहळ्याची मेजवानीदेखील महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या शेतकऱ्यांनी या वेळी अनुभवली.**

पान ४ वर ▸



**पुणे : सकाळ माध्यम समूहाच्या वतीने दिल्या जाणाऱ्या अॅग्रोवन स्मार्ट अॅवॉर्डस्‌चे येथे शुक्रवारी सायंकाळी झालेल्या शानदार कार्यक्रमात वितरण करण्यात आले. या वेळी महाराष्ट्राचा स्मार्ट शेतकरी हा मानाचा पुरस्कार सहकारमंत्री सुभाष देशमुख यांच्या हस्ते स्वीकारताना सांगली जिल्ह्यातील आष्ट्याचे प्रयोगशील शेतकरी संजीव माने. शेजारी (डावीकडून) 'सकाळ'चे संचालक भाऊसाहेब पाटील, 'अॅग्रोवन'चे संपादक आदिनाथ चव्हाण, 'सकाळ'चे मुख्य संपादक श्रीराम पवार, सौ. माने व 'अॅग्रोवन'चे सरव्यवस्थापक प्रमोद राजेभोसले.**



"शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र वर्तमानपत्र काढण्याचा निर्णय अभिजित पवार यांनी घेतल्यानंतर बऱ्याच जणांनी या वृत्तपत्राच्या भवितव्याविषयी शंका व्यक्त केली होती. मात्र शेतकऱ्यांच्या जिज्ञासू वृत्तीवर आमचा विश्वास होता. शेतकरी वाचत नाहीत, हा गैरसमज 'अॅग्रोवन'च्या प्रतिसादामुळे खोटा ठरविला गेला. 'अॅग्रोवन'च्या यशोगाथा वाचून आज हजारो शेतकरी शेती फुलवित आहेत. 'अॅग्रोवन'चे पुरस्कारदेखील इतर शेतकऱ्यांना सतत प्रेरणादायी ठरतील.

– **प्रतापराव पवार,** अध्यक्ष, सकाळ माध्यम समूह



▸ नृत्य, गीतांनी सायंकाळ झाली रंगतदार

...पान ७



▸ शेतकऱ्यांच्या कर्तृत्वाला लाभली अॅग्रोवन अॅवॉर्डस्‌ची झळाळी

...पान ८-९



▸ 'अॅग्रोवन'चे शेतीशी 'डिजिटल' नाते

...पान १०

# कार्यक्षम पाणी वापरासाठी धोरण हवे

## डॉ. बी. व्यंकटेश्वरलू; महाराष्ट्र सिंचन परिषदेचे उद्‌घाटन

**परभणी (प्रतिनिधी):** सिंचनासाठी वापरात येणाऱ्या पाण्याची उत्पादकता अत्यंत कमी आहे. औद्योगिक वापरासाठी पाण्याचा वापर वाढत आहे. त्यामुळे येत्या काळात शेतीसाठी पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्ध होईल की नाही याची शाश्वती राहिली नाही. त्याअनुषंगाने धोरणे निश्चित करून कार्यक्षम पाणी वापरासाठीची त्यांची अमंलबजावणी करावी लागणार आहे, असे प्रतिपादन वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. बी. व्यंकटेश्वरलू यांनी शनिवारी (ता. ३०) केले.

येथील ज्ञानोपासक महाविद्यालयामध्ये 'दुर्मिळ पाण्याचे आदर्श व्यवस्थापन' या विषयावर आयोजित १८ व्या महाराष्ट्र सिंचन परिषदेचे उद्‌घाटन झाले. यावेळी डॉ. बी. व्यंकटेश्वरलू अध्यक्षस्थानी होते.

अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. व्ही. एम. भाले, महाराष्ट्र सिंचन सहयोगचे अध्यक्ष डॉ. दि. मा. मोरे, माजी कुलगुरू डॉ. व्यंकट मायंदे, परिषदेचे स्वागताध्यक्ष माजी खासदार गणेशराव दुधगावकर, परभणी सिंचन सहयोगच्या अध्यक्षा डॉ. संध्याताई दूधगावकर, प्रा. बापू अडकिने आदी उपस्थित होते.

पान ४ वर ▸

# नाशिक बाजार समिती आणि जिल्हा बँक बरखास्त

## एकाच दिवशी दोन्ही संस्थांच्या संचालक मंडळांवर कारवाई, प्रशासक नियुक्ती

**नाशिक (प्रतिनिधी) :** भ्रष्टाचार, गैरव्यवहाराच्या कारणांवरून नाशिक बाजार समिती आणि नाशिक जिल्हा बँकेच्या संचालक मंडळांचा कारभार नेहमीच चर्चेत राहिला आहे. शासन स्तरावरून याची चौकशी सुरू होती. वर्ष २०१७ च्या अखेरच्या दिवशी शनिवारी (ता. ३०) या दोन्ही संस्थांच्या संचालकांना मोठ्या कारवाईला सामोरे जावे लागले आहे. या दोन्ही संस्थांचे संचालक मंडळ एकाच दिवशी बरखास्त करण्यात आले असून, दोन्ही ठिकाणी प्रशासक राज सुरू झाले आहे.

नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक मंडळ बरखास्त करण्यात आले असून, अपर निबंधक अनिल चव्हाण यांची प्रशासक म्हणून नियुक्ती केल्याची माहिती जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडून मिळाली आहे.

**भ्रष्टाचारामुळे बाजार समिती चर्चेत**

भ्रष्टाचाराची विविध प्रकरणे बाहेर आल्यानंतर ही बाजार समिती बरखास्तीसाठी भारतीय जनता पार्टीच्या मुंबई येथील मुख्य कार्यालयातून विशेष प्रयत्न झाले होते.

पान ४ वर ▸

# Logo appearance in Digital Event Promotion On Agrowon Corporate Website, News Website & Social Media Platform



ॲग्रोवन स्मार्ट ॲवॉर्डस् २०१७

# OOH-
# Logo appearance on Hoardings
# (10 in Nos.) at prominent agri potential centers





















# Logo appearance on Promotion Material
## Invitation letter
## VIP Pass




# Logo appearance on Promotion Material
## Invitation letter
## Special Event Pass



# Logo appearance in Event Promotion
## Advt in SAAM TV-
## More than 30 in Billboards & L- band




Billboard : 24 (w) x 18 (h)



# Logo appearance on Promotion Material
## Invenue Branding








# Logo Appearance in Publicity Material
## Trophy & Certificate





अॅग्रोवन

अॅग्रोवन स्मार्ट अॅवॉर्डस् २०१७

**श्री. संजीव गणपतराव माने**

कल्पकता, जिद्द आणि कष्टाच्या बळावर आव्हानात्मक परिस्थितीवर मात करून आपण शेती क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळवले. शेती हे कठीण व्रत मानले जात असताना आपण त्याच्याशी निष्ठा, अभंग ठेऊन गाजवलेले कर्तृत्व अनुकरणीय आणि प्रेरणादायी आहे. आपण प्रगतीचा ध्यास केवळ स्वतःपुरता मर्यादित ठेवला नाही, तर इतरांनाही त्यात सामील करून घेण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करत आहात. आपल्या या कार्य कर्तृत्वाचा सन्मान करण्यासाठी अॅग्रोवन महाराष्ट्राचा स्मार्ट शेतकरी अॅवॉर्ड देऊन गौरविण्यात येत आहे.

आदिनाथ चव्हाण
संपादक, सकाळ अॅग्रोवन

प्रमोद राजेभोसले
सरव्यवस्थापक, सकाळ अॅग्रोवन

सोनाई | UPL | प्रायोजक | महाधन | Oriental



अॅग्रोवन स्मार्ट अॅवॉर्ड्स २०१७

# Logo appearance Opportunity on LED Branding at Venue








# Logo appearance on Promotion Material

## Dummy Cheque








# Gallery


८ सकाळ ॲग्रोवन | रविवार, ३१ डिसेंबर २०१७

ॲग्रोवन स्मार्ट ॲवॉर्ड्स् २०१७

रविवार, ३१ डिसेंबर २०१७ | सकाळ ॲग्रोवन | ९

## शेतकऱ्यांच्या कर्तृत्वाला लाभली ॲग्रोवन ॲवॉर्ड्स्‌ची झळाळी

पुणे येथे शुक्रवारी झालेल्या दिमाखदार सोहळ्यात 'ॲग्रोवन स्मार्ट शेतकरी ॲवॉर्ड' प्रदान करून राज्यातील अकरा शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात आला. कष्ट, हुशारी, जिद्द यांच्या जोरावर प्रतिकूलतेवर मात करीत शेतीत गाजवलेल्या कर्तृत्वाचा पुरस्काराच्या रूपाने सन्मान करण्यात आला. मान्यवर तज्ज्ञ तसेच राज्यभरातील शेतकऱ्यांनी या सोहळ्याला आवर्जून उपस्थिती दर्शविली.

### 'तिच्या' कर्तृत्वापुढं शब्दही झाले मुके!

ॲग्रोवन स्मार्ट शेतकरी ॲवॉर्ड - प्रेरणा पुरस्कार

### शेतकरी स्वतःच्या हिमतीवर उभा राहावा : प्रतापराव पवार

### ॲग्रोवनमुळे माझे प्रयोग राज्यभरात विस्तारले : माने

स्मार्टकेमकडून २१ हजारांचे साह्य






१० सकाळ ॲग्रोवन | रविवार, ३१ डिसेंबर २०१७

ॲग्रोवन स्मार्ट ॲवॉर्ड्स् २०१७

### पोशिंद्याला मदत करा... तुम्हाला हात जोडून विनंती

सहकारमंत्री सुभाष देशमुख यांचे आवाहन

### 'ॲग्रोवन'चे शेतीशी 'डिजिटल' नाते

ॲग्रोवनच्या 'वेबसाइट आणि ॲपचे सहकारमंत्र्यांच्या हस्ते अनावरण

आपलेही 'डिजिटल' नाते जोडा 'ॲग्रोवन'शी

वेबसाईट : http://www.agrowon.com/

फेसबुक पेज : www.facebook.com/AGROWON/

ट्विटर पेज : www.twitter@.com/AGROWON/

# Thank You
# For Your Support

**-Website-**

www.corporate.agrowon.com II www.agrowon.com